दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

जिथे गाव.. तिथे वार्ताहर..!
महाराष्ट्रात
सातारा सांगली कोल्हापूर रायगड सिंधुदुर्ग
जिल्हा,तालुका,शहर आणि ग्रामीण भागामध्ये
पत्रकार /वार्ताहर,छायाचित्रकार आणि जाहिरातदार नेमनेआहेत.
दैनिक जनप्रभात सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
7875613619,883006884
या लोकप्रिय वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
❊ पात्रता ❊
१. समाजसेवेची आवड
२. जनसंपर्क
३. स्मार्ट फोन असणे आवश्यक
४. सोशल मीडियाचा वापर करता येणे
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

❊ (आष्टी) वर्धा ❊ बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ ❊ वर्ष ४ थे ❊ अंक ९३ ❊ पृष्ठ ६ ❊ मूल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी 2026-27 या वर्षासाठी 1497 कोटी रुपये प्रस्तावित

मुंबई उपनगर जिल्हा नियोजन समितीची बैठक

मुंबई, दि. १०: मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी २०२६-२७ या वर्षासाठी ७१० कोटी रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी देण्यात आली आणि ७८७ कोटी रुपयांची वाढीव मागणी करण्यात आली असे १४९७ कोटी रुपये २०२६-२७ साठी प्रस्तावित करण्यात आले आहेत. जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत ११०२.७४ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, शंभर टक्के निधी खर्च होण्याच्या दृष्टीने सर्व विभागानी काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिल्या.

मुंबई उपनगर जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीची बैठक आज वांद्रे येथील चेतना महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा हे होते. सभेला जिल्हाधिकारी सौरभ कटीयार, जिल्हा नियोजन अधिकारी संजयकुमार शिंदे यांच्यासह नियोजन समितीचे सदस्य, खासदार, आमदार तथा विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुंबई उपनगरामध्ये वाहतूक कोंडीच्या समस्या तातडीने उपाययोजना करणे, कांदळवन संवर्धन करणे, डीपी रस्त्यांचे काम प्राधान्याने करणे, तसेच ड्रग माफियांविरुद्ध कडक कारवाई करण्याचे निर्देश पालकमंत्री ॲड. शेलार यांनी या बैठकीत दिले.



मुंबई उपनगरात राबविण्यात येणारे विविध नावीन्यपूर्ण उपक्रम

बोरीवली, अंधेरी व कुर्ला येथे राज्यातील पहिले अत्याधुनिक सेवा सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे. युवक व महिलांसाठी रोजगार संधी निर्माण करणारा वॉर्ड स्तरीय कौशल्य सर्वेक्षण हा देशातील पहिला पथदर्शी उपक्रम ठरणार आहे. तसेच, केंद्रीय मत्स्य प्रशिक्षण संस्था (सीआयएफई), वर्सोवा येथे महाराष्ट्रातील पहिले मत्स्य आरोग्य क्लीनिक स्थापन करण्यात येत असून, यामुळे मत्स्य व्यवसायाला चालना मिळणार आहे. विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित डिजिटल ज्ञान केंद्र उपनगरात उभारण्यात येणार आहे. गोराई येथे मल्टीस्पेशालिटी पशुवैद्यकीय रुग्णालय उभारण्यासाठी रु. 58.22 कोटींच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून प्राण्यांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. प्रशासकीय बळकटीकरणासाठी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात रु.7.41 कोटींच्या निधीतून नियोजन भवन इमारत बांधण्यात येणार आहे. पर्यटन व पर्यावरणपूरक विकासासाठी गोराई येथे कांदळवन उद्यान विकास, बांदा येथे एक्सपेरियन्स सेंटर आणि वर्सोवा येथे बीच प्रोजेक्शन मॅपिंग शो यांसारखे वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

जिल्ह्यातील नागरी दलितेतर वस्त्यामध्ये सुधारणा या योजने अंतर्गत 421.88 कोटी, संभाव्य दरड कोसळण्याच्या ठिकाणी झोपडपट्टीवासियांचे स्थलांतर व पुनर्वसन या योजनेंतर्गत 71.34 कोटी, भांडुप येथे पक्षी उद्यान तसेच इको टुरिजम तथा वन पर्यटन विकास या योजनेंतर्गत 39.50 कोटी, गृह विभागाच्या विविक्षित प्रयोजनासाठी योजना या अंतर्गत 26.96 कोटी, लहान मासेमारी बंदरे या योजनेंतर्गत 12.50 कोटी तसेच जिल्ह्यातील 28 पर्यटन स्थळंच्या विकासासाठी पर्यटन विकास या योजनेंतर्गत 12.23 कोटी रुपयांची वाढीव मागणी या बैठकीत प्रस्तावीत करण्यात आली.

'हिंद दी चादर' शहीदी समागमासाठी

प्रशासन सज्ज वाहतूक, पार्किंग व रेल्वे व्यवस्थेचे सूक्ष्म नियोजन

नवी मुंबई, दि. १० (विमाका):

'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर' यांच्या 350 व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त 28 फेब्रुवारी व 1 मार्च 2026 रोजी खारघर, सेक्टर 29 येथील ओवे मैदानावर आयोजित भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक, पार्किंग आणि नागरिकांच्या सोयीसुविधांचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. कार्यक्रमस्थळी येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्ती तसेच सामान्य नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात आज आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) फरोग मुकादम, सह आयुक्त (करमणूक) रवींद्र पवार, उपजिल्हाधिकारी रोहयो तथा नवी मुंबई समागम समन्वयक गजानन धुमाळ आदी उपस्थित होते.



रवींद्र राठोड, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अंशुमन श्रीवास्तव व रवींद्र इंगोले, प्र. माहिती उपसंचालक मनोज सानप, जेएनपीएचे वाहतूक अधिकारी यशवंत पाटील व नागेश आकोडे, तसेच तहसिलदार (सामान्य प्रशासन)

नागपूर व नांदेड येथे शिस्तबद्ध व शांततेत पार पडलेल्या या समागमानंतर खारघर येथे होणाऱ्या कार्यक्रमासाठी देश-विदेशातून लाखोंच्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याबरोबरच एआय तंत्रज्ञानाचा वापर करून वाहतूक नियंत्रण करण्याच्या सूचना आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिल्या. नाशिक, पुणे व मुंबईकडून जेएनपीएकडे जाणाऱ्या तसेच जेएनपीएकडून विविध ठिकाणी जाणाऱ्या कंटेनर वाहतुकीचे विशेष नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. कार्यक्रमस्थळी येणाऱ्या बससेससाठी स्वतंत्र मार्गिका निश्चित करणे, पुरेशी पार्किंग व्यवस्था करणे आणि आवश्यकतेनुसार पर्यायी मार्ग उपलब्ध ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक रेल्वेने येण्याची शक्यता लक्षात घेता, दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी पश्चिम, मध्य आणि हार्बर रेल्वे मार्गावर मेगाब्लॉक ठेवू नये, यासाठी रेल्वे प्रशासनाशी पत्रव्यवहार करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

दोन मुलांपेक्षा अधिक अपत्य : निवडणूक लढवता येणार, सरकारचा मोठा निर्णय

परभणी / दत्तात्रय कराळे

भारतात निवडणूक लढवण्याचे नियम प्रत्येक राज्यात वेगवेगळे आहेत. निवडणुकांसंदर्भात राज्य सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. पंचायत आणि महानगरपालिका निवडणुकांसाठी दोन मुलांची अट रद्द केली जाण्याची शक्यता आहे. तीन दशकांपासून सुरू असलेला हा नियम रद्द करण्यासाठी सरकारने मोठी पावलं उचलली आहेत. विधानसभेत सादर केलेल्या सरकारच्या उत्तरात तीन किंवा त्याहून अधिक मुले असलेल्या व्यक्ती आता नगरपालिका आणि पंचायतच्या निवडणुका लढवण्यास पात्र ठरू शकते. सरकारचा हा निर्णय "मिशन २०२६" चा एक भाग असल्याचे मानले जात आहे. याचा उद्देश ग्रामीण आणि



शहरी भागातील मतदारांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात व्यापक असा सामाजिक सहभाग सुनिश्चित करणे आहे. लोकशाहीमध्ये निवडणूक लढवण्याचा अधिकार कुटुंबाच्या आकाराशी जोडला जाऊ नये, असेही सरकारकडून सांगण्यात येत आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागासह मागासवर्गीय आणि उपेक्षित समुदायांना महत्त्वपूर्ण असे राजकीय फायदे मिळण्याची शक्यता आहे. या अटींमुळे अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींना यापूर्वी निवडणूक प्रक्रियेतून वगळण्यात आलंय. सरकार लवकरच या संदर्भात कायदेशीर प्रक्रिया आणि सुधारणा अंतिम करेल अशी अपेक्षा आहे. मात्र राजस्थान सरकारच्या या निर्णयाला विरोधक विरोध करत आहेत. पीसीसी प्रमुख गोविंद सिंह दोतासरा यांनी याला लोकसंख्या नियंत्रण धोरणापासून दूर जाऊ असं म्हटलंय. भैरोंसिंग शेखावत यांनी दोनपेक्षा जास्त मुले असलेल्यांना निवडणूक लढवण्यास बंदी घातली होती. परंतु आता तीनपेक्षा जास्त मुले असण्याबाबत संघ प्रमुख मोहन भागवत यांच्या विधानानंतर सरकार त्यांचे अनुकरण करत आहे. हा निर्णय घेत असल्याचं म्हटलंय.

महाराष्ट्रात विक्रमी परकीय गुंतवणूक – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

लोकसत्ता वृत्तपत्राच्या वर्धापनदिनास मुख्यमंत्र्यांची प्रमुख उपस्थिती

मुंबई, दि. १०: देशातील सर्वात जास्त थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात होत असते. मात्र आता ही गुंतवणूक देशात जास्तच नाही, तर रेकॉर्ड मोडणारी ठरत आहे. आर्थिक व्यवस्थेला उत्सवाचे स्वरूप दिल्यामुळेच उद्योगस्नेही वातावरण राज्यात तयार झाले आहे. यामुळेच महाराष्ट्रात 'रेकॉर्ड तोड' गुंतवणूक होत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. लोकसत्ता वृत्तपत्राच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, स्वित्झर्लंड मधील दावोस येथे जागतिक अर्थ परिषदेत ३० लाख कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. तसेच १२ लाख कोटींचे करार अंतिम करण्यात आले आहे. या जागतिक परिषदेत परकीय गुंतवणूक असेल तेच करार करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यामुळे प्रत्येक करारातून राज्यात थेट परकीय गुंतवणूक येणार आहे. दावोस येथे महाराष्ट्राच्या दालनाला गुंतवणूकदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. तेथे १० राज्यांपैकी महाराष्ट्राचाच बोलबाला होता. या परिषदेत झालेल्या करारांचे प्रत्यक्षात उद्योगात रूपांतर होण्याचे राज्याचे प्रमाण ७५ टक्के आहे. राज्यात ' इज ऑफ डूइंग बिझनेस' करण्यासाठी ' हंड्रेड रिफॉर्म्स इन टू मंथ' असा उपक्रम राबविण्यात येत आहे. विविध १०० सुधारणांनी उद्योगस्नेही वातावरण गुंतवणूकदारांना अधिकाधिक आकर्षित करणार आहे. तसेच मैत्री पोर्टलच्या माध्यमातून उद्योगांसाठी सिंगल विंडो सिस्टीम कार्यान्वित करण्यात आली आहे. राज्यात उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्यात येत आहे. राज्याच्या सर्व दूर



भागात गुंतवणूक होत आहे. गडचिरोली ' स्टील सिटी ऑफ इंडिया' म्हणून समोर येत आहे. ऑटोमोबाईल उद्योगांमध्ये नागपूर नाव ठळकपणे पुढे आले आहे. महिंद्रा कंपनीने १५ हजार कोटींची गुंतवणूक नागपूर येथे केली आहे. या ठिकाणी भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा ऑटोमोबाईल प्रकल्प महिंद्रा कंपनी उभारत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. देशात विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या निर्मितीची सर्वात मोठी क्षमता छत्रपती संभाजीनगरमध्ये तयार होत आहे. पुढील पिढीची विद्युत वाहने संभाजीनगरमध्ये उत्पादित केल्या जाणार आहे. दावोसमध्ये उत्तर महाराष्ट्रातील पाचही जिल्ह्यात गुंतवणूक आली आहे. धुळे जिल्ह्यातील नरडाणा औद्योगिक वसाहत भविष्यातील उद्योगांचे मॅग्नेट ठरणार आहे. नंदुरबारसारख्या मागासलेल्या जिल्ह्यात उद्योग येत आहेत. केवळ औद्योगिकीकरणावर शासनाचा भर नाही तर त्यामुळे एक चांगली परिसंस्था निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. राज्यात विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक वर्तमानपत्र वाचले पाहिजे. याकरिता वर्तमानपत्र वाचनावर आधारित उपक्रम सुरू करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, १ मे २०२६ पर्यंत आपले सरकार पोर्टलचा टप्पा दोन कार्यान्वित करण्यात येणार आहे. राज्यात सध्या १ हजार सेवा ऑनलाइन स्वरूपात देण्यात येत आहेत. मात्र यापैकी २९ सेवा या ९९ टक्के नागरिकांना लागत असतात. या २९ सेवा सुलभ, जबाबदारीने आणि गतिशीलपणे नागरिकांना दिल्या तर नागरिकांना शासनाकडे येण्याचे काम पडणार नाही त्यांचे समाधान होऊ शकेल. ई-गव्हर्नन्स मुळे शासकीय सेवेमध्ये निश्चितच गतिशीलता आली आहे. अधिक गतिशीलता आणण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचापण उपयोग केल्या जाणार आहे.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकसत्ता वर्षवेध २०२५ विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला वरिष्ठ सनदी अधिकारी, मराठी चित्रपट सृष्टीतील मान्यवर उपस्थित होते.

संपादकीय...

पैशांचा खेळ आणि सत्तेचा वापर करून उमेदवार बिनविरोध : ही मतदारांची फसवणूकच!

लोकशाही ही केवळ मतदानाची प्रक्रिया नाही; ती जनतेच्या इच्छेचा, विचारांचा आणि पर्याय निवडण्याच्या अधिकाराचा उत्सव आहे. मात्र अलिकडच्या काळात पैशांचा खेळ, सत्तेचा दुरुपयोग आणि दबावतंत्र यांच्या जोरावर उमेदवार बिनविरोध निवडून आणण्याचे जे प्रकार वाढत आहेत, ते या लोकशाहीच्या मुळावरच घाव घालणारे आहेत. बिनविरोध निवड म्हणजे लोकशाही यश नव्हे, तर अनेकदा ती मतदारांच्या हक्कांवर टाकलेली गदा ठरते. कागदोपत्री बिनविरोध निवड ही कायदेशीर प्रक्रिया असली, तरी तिच्यामागील वास्तव अनेकदा अस्वस्थ करणारे असते. विरोधी उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरूच न देणे, दबाव टाकणे, आर्थिक प्रलोभने दाखवणे, सत्तेची भीती निर्माण करणे, या सर्व मार्गांनी स्पर्धाच संपवली जाते. अशा वेळी मतदाराला मतदानाचा हक्क मिळतोच कुठे? निवडणूक न होता सत्ता हस्तगत केली जाते, ही वस्तुस्थिती लोकशाहीच्या आत्म्यालाच छेद देणारी आहे. लोकशाहीत निवडणूक ही स्पर्धेची प्रक्रिया आहे. विचारांची, कार्यक्रमांची, धोरणांची आणि नेतृत्वगुणांची तुलना करण्याचा तो एकमेव मार्ग आहे. मात्र बिनविरोध निवडींच्या नावाखाली ही तुलना टाळली जाते. पैसा आणि सत्ता यांच्यापुढे सामान्य नागरिकाचा आवाज गुदमरतो. मतदाराला विचारण्याआधीच निर्णय घेतला जातो. ही प्रक्रिया म्हणजे लोकशाहीचे औपचारिकीकरण आणि लोकशक्तीचे हत्यारांतर होय. आज स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा इतर निवडणुका बिनविरोध निवडींचे प्रमाण वाढत चालले आहे. यामागे "एकमत", "संमती", "शांतता" असे गोंडस शब्द वापरले जात असले, तरी प्रत्यक्षात ही शांतता दडपशाहीतून निर्माण झालेली असते. विरोधी मत मांडण्याचे धाडसही अनेकांना करता येत नाही, ही खरी शोकांतिका आहे. पैसा बोलतो, सत्ता धमकावते आणि लोकशाही गप्प बसते. हे चित्र केवळ राजकीय पक्षांचे अपयश नाही, तर समाजाच्या सामूहिक संवेदनशून्यतेचेही द्योतक आहे. लोकशाही ही मागून मिळणारी देणगी नसून, पुढे जाऊन मिळवायची जबाबदारी आहे. मतदार जर "बिनविरोध म्हणजे चांगले" असे मानू लागला, तर तो स्वतःच आपल्या अधिकारांवर पाणी सोडतो आहे, हे लक्षात घ्यायला हवे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीला केवळ राज्यपद्धती नव्हे, तर जीवनपद्धती मानले. या जीवनपद्धतीत मतभेद, विरोध आणि पर्याय यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. जिथे विरोध संपवला जातो, तिथे लोकशाही संपते आणि एकाधिकारशाहीची बीजे रोवली जातात. बिनविरोध निवडींचा अतिरेक हीच बीजे रुजवतो आहे. निवडणूक आयोग, प्रशासन आणि राजकीय पक्ष यांनीही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. बिनविरोध निवडी हा अभिमानाचा विषय न मानता, अपवाद म्हणून पाहिले गेले पाहिजे. मुक्त, निर्भय आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करणे ही केवळ घटनात्मक जबाबदारी नाही, तर लोकशाही टिकवण्याची अट आहे. मतदारांनीही जागे होणे गरजेचे आहे. निवड करण्याचा अधिकार हा लोकशाहीचा गाभा आहे. तो हिरावून घेतला जात असेल, तर ती शांततेने स्वीकारण्याची बाब नाही. पैसा आणि सत्तेच्या जोरावर उभे राहणारे बिनविरोध उमेदवार लोकप्रतिनिधी नसून, लोकशाहीच्या पोकळपणाचे प्रतीक ठरतात. लोकशाही ही संघर्षातून घडलेली व्यवस्था आहे. ती टिकवायची असेल, तर संघर्षाची तयारीही ठेवावी लागते, विचारांचा संघर्ष, मतांचा संघर्ष आणि अन्यायाविरुद्धचा संघर्ष. बिनविरोध निवडींच्या नावाखाली जर हा संघर्ष संपवला जात असेल, तर तो लोकशाहीचा विजय नव्हे, तर पराभव आहे. आज प्रश्न साधा आहे, आपल्याला मतदार हवेत की फक्त आकडे? निवडणूक हवी की केवळ घोषणा? जर उत्तर लोकशाहीच्या बाजूने असेल, तर पैशांचा खेळ आणि सत्तेच्या जोरावर घडवली जाणारी बिनविरोध निवड ही मतदारांची फसवणूक आहे, हे ठामपणे सांगावेच लागेल. लोकशाही टिकवायची असेल, तर निवडणूक ही स्पर्धा म्हणूनच झाली पाहिजे. अन्यथा उद्या मतदान केंद्रे उघडी राहतील, पण लोकशाही आतून केव्हाच बंद झालेली असेल.

मुंबईत उमेदवारी मागे न घेतल्यास धमकी देऊन विरोधी उमेदवारांना मैदानातून हुसकावून लावले आणि त्यानंतर सत्ताधारी पक्षाच्या उमेदवाराचा बिनविरोध विजय साजरा करत बॅनर, पोस्टर झडकवले, ही घटना लोकशाहीच्या इतिहासात काळ्या अक्षरांनी नोंदवावी अशी आहे. हा विजय नसून धाक, धमकी आणि दहशतीवर उभारलेली सत्ता आहे. निवडणूक न होता विजयाचे जल्लोष करणे म्हणजे मतदारांच्या तोंडावर तमाचा मारण्यासारखे आहे. मत मांडण्याचा, निवडणूक लढवण्याचा आणि पर्याय देण्याचा हक्क जर धमकीच्या जोरावर हिरावून घेतला जात असेल, तर ती लोकशाही नाही; तो उघडपणे सत्तेचा गैरवापर आहे. मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत असा प्रकार घडतो आणि सत्ताधारी त्याचे प्रदर्शन मिरवत असतील, तर हा केवळ राजकीय अधःपतनाचा नव्हे, तर लोकशाहीच्या निर्लज्जपणाचा कळस आहे. बिनविरोध निवड ही अभिमानाची बाब नाही, विशेषतः ती धमकीतून जन्माला आली असेल तर ती लाजिरवाणी आहे. विजयाचे पोस्टर झडकवताना एकही प्रश्न सत्ताधाऱ्यांनी स्वतःला विचारला का? ही सत्ता मतांनी मिळाली आहे की भयाने? ही निवड जनतेची आहे की गुंडगिरीची? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानात धमकीला जागा नाही; विरोधाला आहे. मतभेदांना आहे, पर्यायांना आहे. पण आज मुंबईत जे घडले, ते संविधानाच्या आत्म्यावर चालवलेले बूट आहे. अशा 'विजयां'मुळे लोकशाही मजबूत होत नाही; ती आतून पोखरली जाते. निवडणूक आयोग, प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांचे मौन हे या दहशतीला दिलेले मूक समर्थन ठरते. आज जर धमकी देऊन उमेदवारी मागे घ्यायला लावली जात असेल, तर उद्या मतदारांनाच मतदानापासून रोखले जाणार नाही, याची काय खात्री ?लोकशाही ही भीतीत जगण्यासाठी नाही, तर निर्भयपणे निवड करण्यासाठी आहे. मुंबईत घडलेला हा प्रकार म्हणजे सत्तेचा विजय नव्हे, तर लोकशाहीचा पराभव आहे. आणि अशा पराभवावर झळकवले जाणारे बॅनर हे विजयाचे नव्हे, तर लोकशाहीच्या मृत्यूचे फलक आहेत.

प्रवीण बागडे

नागपूर

मो.क्र. ९९२३६२०९१९

जनगणना: जनतेचे अमूल्य योगदान!

(9-15 फेब्रुवारी:भारतीय जनगणना आरंभ दिवस विशेष)



लोकांची मोजणी करण्याची प्रथा शासनव्यवस्थेच्या स्थापने इतकीच जुनी आहे. ईजिप्शियन, ग्रीक, रोमन, हिब्रू, पर्शियन, या लोकांनी लोकसंख्येची मोजणी वेळोवेळी केल्याचे इतिहासात नमूद आहे. चीन-जपानमध्येही पुरातन काळापासून अशी मोजणी होत असे. साधारणतः अशी मोजणी सैन्यभरतीस योग्य वय असलेल्या नागरिकांची किंवा करपात्र लोकांची संख्या समजण्यासाठी जरूर तेव्हा होत असे. सबंध शहराची लोकसंख्या मोजण्यास यूरोपमध्ये पंधराव्या व सोळाव्या शतकांत सुरुवात झाली. मद्रास शहराची अशी लोकसंख्या मोजणी सन १६८७मध्ये झाल्याचे नमूद आहे. त्यानंतर राष्ट्रीय स्वरूपाची जनगणना सुरू झाली. सरकारला ओबीसी प्रवर्गातील लोकांची वेगळ्या रकान्यातून जनगणना करावीच लागेल. का व कशी? यावर जोर देणारा लेख श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी यांच्या रोखठोक शब्दांतून... संपादक. स्वीडनमधील पहिली जनगणना सन १७५०मध्ये झाली. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात १७९० पासून व ग्रेट ब्रिटनमध्ये १८०१ पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात येतात. भारतात पहिली जनगणना दि.९ फेब्रुवारी १८७२ रोजी सुरू करून ती काही महिन्यांती पार पडली व त्यानंतर सन १८८१पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात आल्या. काही राष्ट्रे जनगणना दर पाच वर्षांनी घेतात, तर काही त्यांना जरूर वाटेल तेव्हा जनगणना करतात. हे काम बरेच खर्चाचे असल्यामुळे बहुतेक राष्ट्रांत दर दहा वर्षांनी जनगणना करण्याची प्रथा आहे. सुरुवातीस जनगणनेच्या वेळी प्रत्येक कुटुंबाविषयीची माहिती गोळा करीत, परंतु नंतर प्रत्येक व्यक्तीबद्दल माहिती गोळा करण्यात येऊ लागली. पुढे पुढे गरीब, दुर्बल, मागास समाज घटकांची माहिती घेतली जाऊ लागली. आता इतर मागासवर्ग- ओबीसींची माहिती गोळा करणे क्रमप्राप्त व अत्यावश्यक नाही का? अशी व्यक्तिगत स्वरूपाची राष्ट्रीय जनगणना सर्व प्रथम बेल्जियममध्ये सन १८४६मध्ये व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात सन १८५०मध्ये घेण्यात आली. हळूहळू सर्वच राष्ट्रांनी अशा प्रकारची जनगणना घेण्यास सुरुवात केली. सन १९६०च्या सुमारास सबंध जगात एकूण १८०हून अधिक जनगणना घेण्यात आल्या आहेत. त्यात लोककल्याणाच्या उदयोन्मुख समस्या व प्रश्नांना प्राधान्याने घेऊन त्यासाठी विकासात्मक धोरण अवलंबिले आहेत. हे काय खोटे आहे?



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप-
९४२३७१४८८३.

स्वातंत्र्यपूर्व काळात आठ व स्वातंत्र्योत्तर काळात तीन वेळा जनगणना या भारतात झाल्या. वेळोवेळी जनगणना अधिनियम संमत करण्यात येऊन त्यांनुसार जनगणना घेतली जाते. त्यासाठी आयुक्त, संचालक, पर्यवेक्षक वगैरे अधिकारी नेमण्यात येतात. त्यांना इतर अधिकाऱ्यांची मदत होते. प्रत्यक्ष गणनेचे काम प्रगणकांकडे सोपविण्यात येते. शिक्षक, पोलीस, जिल्हा परिषदांचे व नगरपालिकांचे कर्मचारी या सर्वांची मदत गणनेसाठी घ्यावी लागते. त्यांची निवड झाल्यावर जनगणना कशी घ्यावी? निरनिराळ्या यादया व अनुसूच्या कशा वापराव्यात? प्रश्नांवलीतील प्रश्नांची उत्तरे कशी लिहून घ्यावीत? आदी बाबींचे त्यांना प्रशिक्षण द्यावे लागते. त्यांच्याकडून नमुन्यादाखल काही माहितीही गोळा करून घ्यावी लागते. सन १९७१मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी प्रगणकाला चार प्रकारच्या यादया तयार कराव्या लागल्या होत्या. आज इतर मागासवर्ग आपली जनसंख्या जाणून घेण्याच्या मनस्थितीत आहे, तेव्हा त्यांचीही माहिती वेगळ्या रकान्यातून करणे प्रशासनाला अत्यंत निकडीचे आहे, आढेवेढे घेऊन ते टाळणे महागात पडू शकते. कारण व्यक्तिगत पट्टीदवारा गोळा केलेली सर्व माहिती गोपनीय मानली जाते. देशाच्या काही भागांत स्थानिक वा राजकीय अडचणींमुळे गणनेच्या कालखंडात आवश्यक ते फेरफार करावे लागतात. जनगणनेत गोळा झालेल्या माहितीचे जिल्हागणिक आणि राज्यागणिक संकलन करून तात्पुरत्या स्वरूपाचे आकडे जनगणनेचे काम संपल्यापासून पाच दिवसांच्या आतच मध्यवर्ती जनगणना कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकतात. यावरूनच या अवाढव्य प्रशासकीय प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या संघटनात्मक प्रयत्नांची व भारतीय जनतेने दिलेल्या उत्स्फूर्त सहकार्याची काहीशी कल्पना येऊ शकते. याकामी जनतेचे सहकार्य फार मोलाचे ठरते. आता जर का भारत सरकारने इतर मागास वर्ग- ओबीसी समाजघटकातील लोकांच्या इच्छेविरुद्ध जनगणना सुरू केली तर त्यांचे सहकार्य मिळणे शक्यच नाही. हा संपूर्ण घटक- समूह पुढील प्रत्येक जनगणनेवर बहिष्कार टाकण्याच्या पावित्र्यात खंबीर उभा ठाकला आहे. त्यामुळे देशाच्या विकास कार्यास खिळ बसणे साहजिकच आहे. जनगणना म्हणजे एखाद्या राष्ट्राच्या हद्दीत राहणाऱ्या लोकांची मोजणी होय. आधुनिक काळात प्रत्येक राष्ट्रातील शासनाचे हे एक अटळ कर्तव्य झाले आहे. राष्ट्राची लोकसंख्या किती? त्यातील लोकांची सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्ये कोणती? त्यांचे राष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत वितरण कसे झाले आहे? सामाजिक व जीवशास्त्रीय फेरफारांचे त्यांच्यावर कसकसे परिणाम होतात? आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक किती? सामाजिक घटक कोणते? त्या त्या सामाजिक घटकांतील लोकसंख्या किती? आदी अनेक प्रश्न दैनंदिन प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरतात. त्यांना यशस्वीरित्या हाताळण्यासाठी आवश्यक असलेली माहिती जनगणनेद्वारा उपलब्ध होते. शासनाला केवळ जनगणनाच नव्हे, तर प्रसंगोपात इतर अनेक प्रकारच्या गणना करण्याची आवश्यक भासत असते. उदा. कृषिगणना, पशुधनगणना, उत्पादनगणना, घरांची मोजणी, जनगणना इत्यादी. मग ओबीसी जनगणना का बरे होऊ नये? अशा सर्व गणनांतून उपलब्ध होणारी आकडेवारी राष्ट्रीय प्रगती दर्शविते व राष्ट्राच्या अनेक समस्यांचा उलगडा करण्यास उपयोगी पडते. विशेष करून जनगणनेद्वारे मिळणाऱ्या माहितीतून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप व राष्ट्राचे मानवी भांडवलरूपी सामर्थ्य यांवर यथोचित प्रकाश टाकला जाऊ शकतो. जनगणना म्हणजे विशिष्ट काळी एखाद्या राष्ट्रातील किंवा प्रदेशातील सर्व लोकांबद्दलची जनांकिकीय, आर्थिक व सामाजिक आकडेवारी गोळा करणे आणि तिचे योग्य संकलन करून तिला प्रसिद्धी देण्याची संपूर्ण प्रक्रिया होय. जनगणनेच्या सहा वैशिष्ट्यांवर संयुक्त राष्ट्रांनी भर दिला आहे- जनगणनेला राष्ट्राचा पुरस्कार पाहिजे, तिचे क्षेत्र व घटक निश्चित असले पाहिजे, त्या क्षेत्रातील सर्व व्यक्तींचा त्यात समावेश झाला पाहिजे, ती गोळा केलेली माहिती विशिष्ट कालक्षणाबद्दल असली पाहिजे, प्रत्येक व्यक्तीविषयी अलग-अलग माहिती नमूद केली पाहिजे, गोळा केलेली माहिती प्रसिद्ध झाली पाहिजे. जनगणना करताना संबंधित राष्ट्रे त्यांना त्या वेळी महत्त्वाच्या वाटणाऱ्या बाबींविषयी माहिती गोळा करतात. कालमान व परिस्थिती यानुसार निरनिराळ्या जनगणनांतील बाबी वेगवेगळ्या असू शकतात. जनगणनेत खालील बाबींचा समावेश हवा, असे संयुक्त राष्ट्रांनी सुचविले आहे- जनगणनेच्या वेळी व्यक्तीची स्थाननिश्चिती व नेहमीचे राहण्याचे ठिकाण, कुटुंबप्रमुखाशी नाते, लिंग, वय, वैवाहिक स्थिती, जन्मस्थळ, नागरिकत्व, आर्थिक व्यवसाय, उद्योग, हुद्दा, भाषा, वंशत्व व राष्ट्रीयत्व, साक्षरता, शैक्षणिक पातळी, शालेय हजेरी व प्रत्येक स्त्रीला किती अपत्ये झाली त्यांची संख्या नोंद करावी. ज्या राष्ट्रांना या सर्व बाबींचा जनगणनेत समावेश करता येणे शक्य नसेल, त्यांनी किमानपक्षी लिंग, वय, वैवाहिक स्थिती व आर्थिक व्यवसाय याबाबींची माहिती तरी गोळा केलीच पाहिजे. मागील सन २०११च्या शिरगणतीनंतर म्हणजेच दहा वर्षांनंतर सन २०२१मध्ये होणे क्रमप्राप्त असताना सरकारने जनगणना करण्याकडे जाणूनबुजूनच कानाडोळा केला. आज जनगणनेविना तब्बल ३ वर्षे उलटून गेली. ओबीसींच्या स्वतंत्र जनगणनेला सरकार टरकले की काय? एक न उलगडणारे कोडेच आहे तर.... जनगणना दोन प्रकारांनी करता येते. एकतर प्रत्येक कुटुंबप्रमुखाकडून छापील प्रश्नावली भरून घ्यावयाची किंवा गणना करणाऱ्यांनी कुटुंबप्रमुखांना समक्ष भेटून माहिती घ्यावयाची आहे. काही देशांत जनगणनेपूर्वी सर्व घरांची यादी व मोजणी करतात व तिच्या आधारे जनगणनेच्या वेळी कोणीही वगळले जाऊ नये, अशी काळजी घेतात. गोळा केलेल्या माहितीचे त्वरित संकलन व सारणीकरण व्हावे, अशी व्यवस्था करावी लागते. त्यानंतरच सारणीरूपाने निरनिराळ्या बाबींविषयींची वर्गीकृत माहिती प्रसिद्ध करता येते. जनगणना अपूर्ण राहू नये, तिच्यात चुका होऊ नयेत यांसाठी प्रश्नावली तयार करण्यापासून ते थेट अखेरच्या आकडेवारीचे संकलन प्रसिद्ध करेपर्यंत प्रत्येक टप्प्याला शक्य तेवढी काळजी घ्यावी लागते. जनतेचे पुरेपूर सहकार्य आणि कार्यक्षम प्रशासन यंत्रणा यांशिवाय जनगणनेची कार्यक्षमता व गुणवत्ता पूर्णपणे समाधानकारक असूच शकत नाही. जनगणना अनेक कारणांसाठी घेतली जाते. सामाजिक व आर्थिक विकासाचे प्रयत्न करण्यासाठी ती आवश्यकच ठरते. आरोग्य, साक्षरता, शिक्षण, उत्पन्न, राहणीमान, अन्नपुरवठा, कृषिउत्पादन, औद्योगिक उत्पादन आदी क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्याच्या योजना आखण्यासाठी बऱ्यांच विविध माहितींची आवश्यकता असते. मतदान पद्धतीने लोकप्रतिनिधी निवडणे व कल्याणकारी राज्यातील सुविधांचे योग्य वाटप करणे, यांसाठीही जनगणेतील माहिती उपयोगी पडते. उद्योगपती व व्यापारी संख्या जनगणनेच्या आधारे आपापल्या व्यवसायांचे योग्य नियोजन करू शकतात. शिवाय आर्थिक, सामाजिक व जनांकिकीय प्रश्नांवर संशोधन करणाऱ्यांना जनगणनेमधून उपलब्ध होणारी माहिती अनेक दृष्टींनी उपयुक्त असते. म्हणूनच जनगणनेला संशोधनाचे आणि प्रशासनाचे एक बहुउद्देशीय साधन मानतात. सन १९६१पूर्वी जनगणनेसाठी लागणारी संघटना प्रत्यक्ष गणनावर्षापूर्वी एकदोन वर्षे अगोदरपासून अस्तित्वात येई व जनगणनेची कार्यवाही संपल्यानंतर दोनतीन वर्षांतच विलयास जाई. त्यामुळे जनगणनेच्या प्रश्नांकडे सातत्याने लक्ष पुरविणाऱ्या संघटनेचा भारतात अभाव होता. ही उणीव सन १९६१नंतर भरून काढण्यात आली. केंद्र, प्रत्येक राज्य व केंद्रशासित प्रदेश यांत आता जनगणना कार्यालये सातत्याने कार्यप्रवण असतात. त्यांना आगामी जनगणनेची पूर्वतयारी करण्यास पुरेसा अवधी मिळतो. जनगणनेच्या वेळी राज्यांसाठी नेमण्यात येणाऱ्या पर्यवेक्षकांना आता जनगणना संचालक म्हणतात. सन १९७१च्या जनगणनेसाठी जनगणना आयुक्त आणि महानिबंधक या अधिकाऱ्यांची नेमणूक सन १९६८मध्ये व बहुतेक राज्य संचालकांच्या नेमणुका सन १९६९मध्येच करण्यात आल्या होत्या. मग इतर मागासवर्ग- ओबीसींची स्वतंत्र रकान्यात नोंद करून घेण्यास अडचणी येतीलच कशा?

!! भारतीय जनगणना आरंभ दिनाच्या सप्ताहभर सर्व सूज्ञ भारतीय बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

नाक ..

मयता बद्दल किती
अफवा उठती मुक्त
कुणीकाही बोलतो
मौनीही होई व्यक्त

जातअसता अंतिम
बोललेमजशी फक्त
मलाचं फोन आला
म्हणत राहतो सूक्त

मान्य करावे संवाद
पुरावा नसे स शक्त
संशयाच्यागदारोळा
माणूसबनतोअशक्त

काहीबाहीसांगतात
उसाळती अंध भक्त
घातपात न् अपघात
शक्यता अनेकरिक्त

असे तसे झाले असे
सांगयले होई उद्युक्त
कधी बंद पडणार रे
कहाण्या शंका युक्त

गेलेला पडद्या आड
पंचतत्वात रे विरक्त
कशी जीवंत माणसे
चर्चा चघळे आसक्त

होत राहतीचौकश्या
आटवट बसावे रक्त
स्वच्छव्हावे सगळेचं
कधी होई शंकामुक्त

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

शंका मुक्त ..

मयता बद्दल किती
अफवा उठती मुक्त
कुणीकाही बोलतो
मौनीही होई व्यक्त

जातअसता अंतिम
बोललेमजशी फक्त
मलाचं फोन आला
म्हणत राहतो सूक्त

मान्य करावे संवाद
पुरावा नसे स शक्त
संशयाच्यागदारोळा
माणूसबनतोअशक्त

काहीबाहीसांगतात
उसाळती अंध भक्त
घातपात न् अपघात
शक्यता अनेकरिक्त

असे तसे झाले असे
सांगयले होई उद्युक्त
कधी बंद पडणार रे
कहाण्या शंका युक्त

गेलेला पडद्या आड
पंचतत्वात रे विरक्त
कशी जीवंत माणसे
चर्चा चघळे आसक्त

होत राहतीचौकश्या
आटवट बसावे रक्त
स्वच्छव्हावे सगळेचं
कधी होई शंकामुक्त

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

खापरखेडा येथे इतिहासात पहिल्यांदाच त्यागमूर्ती माता रमाई जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली

खापरखेडा येथील रमाई जयंती मिरवणुकीचा संदेश येणाऱ्या काळात संपूर्ण महाराष्ट्रात पसरेल: भाऊसाहेब बोरकर"

खापरखेडा (दिलीप येवले) :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन संघर्षात महत्त्वपूर्ण सहभाग देणाऱ्या त्यागमूर्ती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सावली माता रमाबाई आंबेडकर जयंती खापरखेडा शहरात यावर्षी पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, समता सैनिक दल आणि भारतीय बौद्ध महासभा यांच्या सहकार्याने माता रमाबाई जयंती उत्सव समिती, खापरखेडा यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते.शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता सत्यशील बौद्ध विहार येथून भव्य मिरवणुकीची सुरुवात झाली. ही मिरवणूक अण्णा मोड, नागमंदिर परिसर आणि गावंडे कॉम्प्लेक्स मार्गाने होते पुन्हा सत्यशील बौद्ध विहार येथे पोहोचून समापन झाले. ढोल-ताशांच्या गजरात, आकाशभेदक निळ्या झेंड्यांनी सजलेल्या मिरवणुकीने संपूर्ण नगराचे लक्ष वेधले. माता रमाबाई आंबेडकर त्याग, सहनशीलता आणि संघर्षाची प्रतिक होती. त्यांच्या योगदानाचे स्मरण करीत आणि सामाजिक समरसता, समानता आणि बंधुत्वाचा संदेश जन-जन



पर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने भीम जयंतीच्या गर्जावर ही भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणुकीचे नेतृत्व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे वरिष्ठ नेते भाऊसाहेब बोरकर यांनी केले. प्रकाश लांजेवार, पृथ्वीराज बागडे, बंडू आवळे, राहुल बागडे, मनोहर डोंगरे, उपाध्यक्ष राजेंद्र मेश्राम, सरपंच मिनाक्षी तागडे, भानेगाव उपसरपंच सोनुताई बोरकर, ग्रामपंचायत सदस्या सोनुताई ठाकरे, अमर जैन, कपिल वानखेडे, बबलू ठाकूर, किशोर बनसोड, राजेश देशभ्रतार, सिद्धार्थ बागडे, रामराव मेश्राम, विजय गजभिये, अजय ढोरे, सुमेध चव्हाण, प्रशांत पाटील, निखिल भिमगडे आणि विविध सामाजिक, राजकीय आणि बौद्ध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमात महिलांची सहभागिता विशेष उल्लेखनीय होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बौद्ध महिला मंडळाच्या सुनंदा लोखंडे, किरण शेंडे,मैनाबाई सोमकुवर, सविता नारनवरे, बेबीबाई बोरकर, नंदिनी पाटील, अभिषेक शेंडे, धम्मा झोडापे, विकास गेडाम, सुमित इंगोले, राजरतन देशभ्रतार, मिलिंद ढोके, रवी शेंडे,आशिष धनविजय,प्रज्वल लांजेवार, भरत गौरखेडे, दद्दू गणवीर, निखिल गणवीर, प्रतीक उके, धिरज देशभ्रतार, नॉडी मानवटकर यांनी अथक परिश्रम घेतले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) **RNI NO : MAHMAR/2022/82242**

राजा हरिश्चंद्र महाशिवरात्र महोत्सवाची सोमवारपासून सुरुवात

राज्यातील नामवंत कीर्तनकारांची लाभणार हजेरी.... महंत भगवान बाबा राजपूत यांचे सुंदर नियोजन

बीड वडवणी प्रतिनिधी:– भारत देशातील राजा हरिश्चंद्राचे एकमेव मंदिर असणारे ठिकाण बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे आहे. या तीर्थस्थळावर दरवर्षीप्रमाणे या वर्षीही राजा हरिश्चंद्र शिवरात्र महोत्सवाची सुरुवात सोमवार ०९ फेब्रुवारी पासून होत असून या शिवरात्र महोत्सवात राज्यातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. या सोहळ्याची पूर्ण तयारी झाली असून बीड जिल्ह्यासह राज्यातील भाविकांनी राजा हरिश्चंद्राच्या दर्शनाचा आणि महाशिवरात्र महोत्सवातील कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन या तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांनी केले आहे. सत्यवादी, न्यायनिष्ठ राजा तसेच स्वप्नात राज्य दान देणारा दानशूर राजा म्हणून ख्याती असलेले राजा हरिश्चंद्राचे एकमेव मंदिर बीड जिल्ह्यातील वडवणी जवळील राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे आहे. या तिर्थस्थळावर संत भगवान बाबा यांनी महाशिवरात्र महोत्सवाची सुरुवात केली होती. त्यांचे उत्तराधिकारी संत भिमसिंह बाबा यांनी ही परंपरा आयुष्यभर चालवली. आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांच्या आधिपत्याखाली या तीर्थ स्थळाचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या नेतृत्वाखाली ही परंपरा चालू आहे. यावर्षी या ठिकाणी महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन केले असून जय्यत तयारी करण्यात आली आहे. राज्यातील नामवंत कीर्तनकार या महोत्सवात आपली हजेरी लावून कीर्तने करणार आहेत. सोमवार दि. ०९ फेब्रुवारी रोजी महोत्सवाची सुरुवात होत असून १६ रोजी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. ०९ रोजी रात्री श्री.हभप. भगीरथ महाराज काळे (सिन्नर), १० रोजी श्री हभप. जयेश महाराज भाग्यवंत (मुंबई), ११ रोजी श्री.ह.भ.प. तुकाराम महाराज मुंडे (परळी वें.), १२ रोजी श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगांव), १३ रोजी श्री.ह.भ.प. कोमलसिंग महाराज (धुळे), १४ रोजी श्री.ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) १५ रोजी महाशिवरात्रीला श्रीक्षेत्र भगवान गडाचे उत्तर अधिकारी श्री.ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री (श्रीक्षेत्र भगवान गड) यांची कीर्तन सेवा होणार असून दिनांक १६ रोजी सकाळी ११:०० ते १:०० या वेळेत महंत भगवान बाबा राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे. यावेळी आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन महंत भगवान बाबा राजपूत यांच्यासह परिसरातील राजा हरिश्चंद्र पिंपरी पंचक्रोशीतील गावकऱ्यांनी केली आहे.चौकटवडवणी तालुक्यातील गावकरी कार्यक्रमाचे यजमानराजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्र हे जगभरात केवळ वडवणी तालुक्यात आहे. या तीर्थक्षेत्रावरील हा कार्यक्रम धुमधडाक्यात व्हावा या उद्देशाने वडवणी तालुक्यातील सर्व गावकरी या कार्यक्रमाचं यजमानपद घेतात. तालुक्यातील हरीचंद्र पिंपरी परिसरातील पिंपरखेड, साळींबा, मामला, कान्हापुर, लक्ष्मिपुर, देवगाव, देवडी, खळवट लिमगाव, परडी, माटेगाव, चिंचाळा, खापरवाडी, दुकडेगाव, चींचोटी, कवडगाव, मोरेवाडी, बाहेगव्हाण, वडवणी, मोरवड, तीगाव, पुसरा, कुप्पा आदी अनेक गावकरी या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी झटणार आहेत.चौकट तरुणांची फौज हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी राजा हरिश्चंद्र पिंपरी आणि पंचक्रोशीतील शेकडो तरुण या ठिकाणी आपली कामे सोडून वाढ करण्यासाठी, स्वच्छता करण्यासाठी, तसेच आलेल्या भाविकांची गैरसोय टाळ ण्यासाठी या ठिकाणी मेहनत घेत असतात. या तरुणांच्या फौजेमुळे या ठिकाणी आलेल्या सर्व भाविकांचे संरक्षणही होत असते. चौकट भरत पठाडे, रवी पवार, रामानंद ढाले, झुका गुरुजी यांची जुगलबंदी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर सर्वांचं आकर्षण असतं ते मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे, गायनाचार्य रवी महाराज पवार आणि गायनाचार्य रामानंद महाराज ढाले यांच्यावर. ख्यातनाम मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे यांचा मृदंग कडाडताना भाविकांना पाहायला मिळतो या मृदंगावर रवी महाराज पवार, रामानंद महाराज ढाले गुरुजी यांची जुगलबंदी पाहताना भाविकांच्या अंगावर काटा उभा राहतो. कीर्तनकारांपेक्षाही ही मंडळी भाविकांचं मन तल्लीन करून टाकतात. त्याचबरोबर १४.०२.२०२६ रोजी संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत ह.भ.प. देविदास महाराज जाधव उर्फ झुकागुरुजी यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यात प्रकाश महाराज कातकडे, श्री. इंद्रभान महाराज गुरूजी, श्री. विठ्ठल म.महागोविंद, श्री. बाजीराव म. काळे, हरिदास म. पांचाळ, श्री. दत्ता म. सातले, श्री जगन महाराज, पांडुरंग म. काळे, श्री. माऊली म. खोटे, श्री. सचिन म.मुंडे, व पंचक्रोशीतील गायक, वादक सातही दिवस उपस्थित राहणार आहेत.चौकट महंत हनुमंत महाराज शास्त्री यांचे दररोज ज्ञानेश्वरी प्रवचनसाल सिद्ध बाबा संस्थानचे महंत ह भ प हनुमंत महाराज शास्त्री यांची दरवर्षी महाशिवरात्र महोत्सवात आठ दिवस उपस्थिती असते या महोत्सवांमध्ये दररोज दुपारी चार ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत ग्रंथराज ज्ञानेश्वरी वर प्रवचन सेवा असते या प्रवचन सेवेला मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. यावर्षी देखील हनुमंत महाराज यांच्या प्रवचन सेवेचा लाभ भाविकांना मिळणार आहे. चौकट यांची होणार हरि कीर्तनसेवाश्री.ह.भ.प. भगीरथ महाराज काळे (सिन्नर)श्री.ह.भ.प. जयेश महाराज भाग्यवंत (मुंबई)श्री.ह.भ.प. तुकाराम महाराज मुंडे (परळी वें.)श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगांव)श्री.ह.भ.प. कोमलसिंग महाराज (धुळे)श्री.ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर)श्री.ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री (उत्तराधीकारी श्रीक्षेत्र भगवान गड)महंत भगवान महाराज राजपूत यांचे काल्याचे कीर्तन





माता रमाई कुटुंबवत्सल असल्याने समाज प्रगतीपथावर : डॉ.सुवर्णा यादव

सातारा : माता रमाई दारिद्र्य,कष्ट व दुःखात वाढली होती.कुटुंबवत्सल असल्याने त्यांनी बाबासाहेबांना अखेरपर्यंत साथ दिली.म्हणूनच बाबासाहेबांनी सर्वसमाज घटकांना न्याय दिला.आजचा समाज प्रगतीपथावर असलेला आढळुन येत आहे.असे प्रतिपादन डॉ.सुवर्णा यादव यांनी केले. माता रमाई महिला मंडळ व पंचशील प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने त्यागमूर्ती माता रमाई यांची १२८ वी जयंती गोडोली (सातारा) येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली.तेव्हा डॉ.सुवर्णा विनोद यादव मार्गदर्शन करीत होत्या. व्यासपीठावर नगरसेवक विनोद (काका)मोरे,बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर,शाहीर प्रकाश फरांदे उपस्थित होते. डॉ.यादव म्हणाल्या,"माता रमाई स्वतः उपाशीपोटी राहून पणतीप्रमाणे तेवत राहिली. म्हणूनच बाबासाहेब परदेशी शिक्षण घेऊन नवसामाज घडविण्यात यशस्वी झाले. संविधान निर्माण करून बाबासाहेब जगजेत्ते ठरले.लोकं पाहतील म्हणून पहाटे व रात्री माता रमा शेण गोळा करीत असे.प्रपंचाचा खर्च करून परदेशी बाबासाहेबांना



अर्थसाहाय्यही करीत.रमाई निरक्षर होत्या तरीही बाबासाहेबांच्या सहवासामुळे मार्गदात्या ठरल्या.माता रमाईला लिहिल्या एका पत्रामध्ये बाबासाहेब आपुकीने म्हणतात,'रामू तू अब्रूने राहा.' माता रमाई यांच्या जवळ नैतिकता व शीलवान होत्याच. असाही उल्लेख थॉट ऑफ पाकिस्तान या पुस्तकातून बाबासाहेबांनी केलेला आढळून येतो.ते पुढे म्हणतात,"तिने साथ दिली म्हणूनच मी उभा राहिलो.' बाबासाहेबांच्या केवळ त्या पत्नी नव्हत्या तर सहृदयी मित्र होत्या. खरोखरच,पतीच्या सन्मानास कधीही माता रमाईच्या धक्का लागू दिला नाही. समाजात चांगुलपणा असला पाहिजे.तेव्हा प्रत्येकांनी कुटुंब व समाजात सन्मानाने वागले पाहिजे." बालक उपासक-उपासिका व मान्यवरांनी मनोगत व्यक्त केली. प्रथमतः माता रमाई यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अनिल वीर व वामन गायकवाड यांच्या हस्ते तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस डॉ.सुवर्णा यादव यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.उपस्थित मान्यवरांनी दीपप्रज्वलन व पुष्पांजली अर्पण केली.मंडळाचे अध्यक्ष निखलेश मस्के,योगेश म्हस्के,प्रा.रमेश म्हस्के आदींनी स्वागत केले.अरुणा रमेश म्हस्के यांनी प्रास्ताविक केले.सुरेखा जालिंदर म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले.प्ररिक्षा म्हस्के यांनी आभारप्रदर्शन केले. सदरच्या कार्यक्रमास बंधुत्व जीवनगौरव पुरस्कार विजेते उत्तम पोळ, माजी प्राचार्य रमेश जाधव,आबा मुळीक, पौर्णिमा मर्ढेकर, नीलिमा सावंत, धम्माचारी संघादित्य,राहुल देवकांत,मिलिंद कांबळे,किरण कांबळे, जालिंदर म्हस्के, रणजित म्हस्के,संपूर्ण म्हस्के परिवार,विविध क्षेत्रातील मान्यवर,कार्यकर्ते, नागरिक, उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

थकीत देयके निकाली काढा- आत्माराम वाव्हळ

बीड दि.८ (प्रतिनिधी): मागिल काही वर्षांपासून प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांचे थकीत देयके निधी अभावी शासनाने निकाली काढले नाहीत. या थकीत बिलासाठी तत्काळ निधी उपलब्ध करून देत थकित बिले लवकरच म्हणजे या वर्षी निकाली काढावेत अशी मागणी विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केली आहे. या बाबत अधिक माहिती अशी की बीड जिल्ह्यात गेल्या पाच ते सहा वर्षांपासून प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांचे थकीत देयके बाकी आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ही थकित देयके शासनाने निकाली काढले नाही, दरवर्षी थकीत बिल टाकले जाते सन २०२४-२५ मध्ये डायरेक्टर लेवलला गेलेले परंतु निधी अभावी बरेच



बिले रिजेक्ट करण्यात आले, परत थकीत बिल टाकण्यासाठी सूचना दिल्या, सन २०२५-२६ मध्ये पुन्हा एकदा थकीत देयके सादर केली परंतु संपूर्ण महाराष्ट्रात बऱ्याच कर्मचाऱ्यांचे थकीत देयके बाकी आहेत. सर्व कर्मचाऱ्यांनी वेतन पथक कार्यालयात थकीत देयके सादर केले, संबंधित कार्यालय थकीत देयके चेक करून पुढे पाठवणार आहे, परंतु त्यांनाकालावधी कमी असल्यामुळे आम्हाला आमचे बिल रिजेक्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने महाराष्ट्रातील वेतन पथक कार्यालयाला बिल चेक करण्यासाठी जास्त (वेळ) कालावधी द्यावा जेणेकरून सर्व कर्मचाऱ्यांचे बिल व्यवस्थित चेक करून पुढे पाठवले जाईल, सर्व थकीत देयके शासनाने याच वर्षात निकाली काढावे. त्या साठी लागणारा पुरेसा निधी उपलब्ध करून देत या वर्षात या हेडचे संपूर्ण थकीत देयके निकाली काढावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केली

महाशिवरात्री यात्रोत्सव दरम्यान भीमाशंकर मंदिर राहणार बंद

भाविकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाचा निर्णय.

महंमद मुलाणी / भीमाशंकर भीमाशंकर मंदिर ९ जानेवारीपासून तीन महिने बंद असलेबाबत प्रशासनाने जाहीर केले असून १२ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी दरम्यान महाशिवरात्री यात्रोत्सव दरम्यान मंदिर दर्शनासाठी उघडे राहणार असलेचे जाहीर केले होते. सभामंडप व पायरी मार्ग कामानिमित्त भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न विचारात घेता या दरम्यान भाविकांसाठी



मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने जाहीर केला आहे. भाविकांनी सदर निर्णय लक्षात घेऊन प्रशासन व विश्वस्त यांना सहकार्य करणेबाबत अवाहन करणेत येत आहे. सन २०२७ मध्ये होत असलेल्या महाकुंभ मेळाव्यानिमित्त भीमाशंकर मंदीर विकास आराखड्याचे काम पूर्ण करणेचे दृष्टिने प्रशासन झपाट्याने काम पूर्ण करणेकामी व्यस्त असून महाकुंभ मेळाव्या दरम्यान भाविकांना सुव्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून भविष्यात देखील भीमाशंकर आराखड्याचे काम भाविकांसाठी वरदान ठरेल.

खानदेश मित्र मंडळ उरण तर्फे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण

दै जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी (विठ्ठल ममताबादे) उरण दि ८ महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री राजकारणातील 'दादा' अजितदादा पवार यांचे बारामतीत विमान दुर्घटनेत दुःखद निधन झाल्याने महाराष्ट्रातील जनतेवर शोककळा पसरली आहे. दिलखुलास व्यक्तिमत्व असलेल्या अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनाबाबत खानदेश मित्र मंडळ उरणच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी शोक व्यक्त केला आहे. उरण शहरातील विमला तलाव गार्डनमध्ये खानदेश




मित्र मंडळ उरणच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या आठवणींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून अजित दादा यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विविध मान्यवरांनी आपल्या भाषणातून अजितदादा यांचे कार्य व विचार अजरामर राहतील, देश समाज त्यांना कधीच विसरणार नाही अशा भावना व्यक्त केल्या. यावेळी खानदेश मित्र मंडळ उरणचे कार्याध्यक्ष सुनील चौधरी,उपाध्यक्ष कैलास भामरे, खजिनदार वामनराव राठोड, सल्लागार संजय पाटील, सभासद भरत पाटील, सभासद रविंद्र पाटील, लता सूर्यवंशी, दत्तू महाले सुनील झोपे, संदीप पाटील, भरत चव्हाण, दिनेश पाटील आदी सभासद उपस्थित होते.

कासा खडक ते खंदेरी किल्ला हे सागरी अंतर अवघ्या 5 तासांत पोहत गाठण्याचा स्वराजचा नवा विक्रम

दै जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी (विठ्ठल ममताबादे)

उरण दि ८ जीवनात जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास असेल तर हमखास यश मिळते, याची प्रचिती उरण, बाजारपूर येथे राहणाऱ्या अवघ्या १२ वर्षीय स्वराज सोनाली संतोष पाटीलने दिली आहे.स्वराजने कासा खडक ते खंदेरी किल्ला हे तब्बल १८ कि.मी.चे सागरी अंतर ५ तास ६ मिनिटांत पोहून पार करत हा धाडसी पराक्रम केला. तो उरणच्या सेंट मेरीज कॉन्व्हेंट स्कूलमध्ये सातवी इयत्तेत शिक्षण घेत असून, त्याने आपल्या आईकडून मिळालेला जलतरणाचा वारसा यशस्वीपणे पुढे नेला आहे.याआधीही स्वराजने उरणमधील मोरा जेट्टी ते मुंबई गेटवे ऑफ इंडिया हे १२ कि.मी.चे सागरी अंतर ४ तास २५ मिनिटांत पोहून पूर्ण केले होते. उरण नगर परिषदेच्या जलतरण तलावात तो नियमित आणि कठोर सराव करत असतो.शनिवारी रात्री ११ वाजून ५० मिनिटांनी कासा खडक येथून स्वराजने आपल्या सागरी मोहिमेला सुरुवात केली.





काळोख, समुद्रातील प्रचंड लाटा, सोसाट्याचा वारा तसेच मोठमोठी जहाजे अशा अनेक अडथळ्यांवर मात करत त्याने अवघ्या ५ तास ६ मिनिटांत खंदेरी किल्ला गाठून इतिहास घडवला आहे . स्वराज हा कमी वयात कमी वेळेत पोहून विक्रम करणारा पहिला जलतरणपट्टू ठरला आहे. या धाडसी कामगिरीसाठी स्वराजचे सर्वत्र कौतुक होत आहे. एवढ्या लहान वयात इतका मोठा सागरी पराक्रम करणारा स्वराज हा उरण तालुक्याचा अभिमान ठरला आहे. त्याच्या या यशामागे कठोर सराव, शिस्तबद्ध जीवनशैली आणि कुटुंबाचा भक्कम पाठिंबा कारणीभूत ठरला आहे. विशेषतः त्याच्या आईने दिलेले मार्गदर्शन आणि जलतरणाची परंपरा पुढे नेण्याची प्रेरणा यामुळेच स्वराज हे यश मिळवू शकला आहे.या मोहिमेदरम्यान स्वराजच्या सुरक्षिततेसाठी बोट, प्रशिक्षक, तसेच सहकारी जलतरणपटूंची योग्य ती व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण प्रवासादरम्यान त्याच्या आरोग्यावर आणि वेळेवर विशेष लक्ष ठेवण्यात आले. समुद्रातील प्रतिकूल परिस्थिती असूनही स्वराजने कोणतीही भीती न बाळगता आत्मविश्वासाने पोहणे सुरू ठेवले, हे विशेष उल्लेखनीय आहे.भविष्यात आणखी मोठी सागरी आव्हाने पेलण्याचा स्वराजचा मानस असून इंग्लिश चॅनेलसारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये देशाचे नाव उज्वल करण्याचे स्वप्न तो पाहत आहे. त्याच्या या यशामुळे अनेक लहान मुलांना जलतरणाकडे व खेळाकडे वळण्याची प्रेरणा मिळणार आहे.स्वराज पाटीलचा हा विक्रम म्हणजे जिद्द, चिकाटी आणि सातत्य यांचे जिवंत उदाहरण असून "योग्य मार्गदर्शन आणि मेहनत असेल तर वय कधीच अडथळा ठरत नाही" हे त्याने सिद्ध करून दाखवले आहे.

पुलगावमध्ये जिल्हास्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा जल्लोषात संपन्न; युवकांच्या फिटनेस संस्कृतीला नवी दिशा – आमदार राजेश बकाने

आरती कारंजेकर देवळी (प्रतिनिधी)

युवकांनी निरोगी, सक्षम आणि आत्मविश्वासपूर्ण जीवनशैली स्वीकारावी, तसेच ग्रामीण भागातही क्रीडा आणि फिटनेस संस्कृती रुजावी या व्यापक दृष्टीकोनातून देवळी–पुलगाव विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार मा. श्री. राजेशजी बकाने यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा, पुलगाव शहर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली "आमदार श्री पुलगाव – जिल्हास्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा" सर्कस ग्राउंड, पुलगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या दिमाखात पार पडली. जिल्ह्याच्या विविध भागांसह परिसरातील अनेक ठिकाणांहून आलेल्या स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून स्पर्धेला भव्य स्वरूप प्राप्त करून दिले.आमदार राजेश बकाने यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून युवकांना आरोग्यदायी जीवनशैली, शिस्त, मेहनत आणि आत्मविश्वासाचे महत्त्व पटवून देण्याचा संदेश दिला. ग्रामीण आणि लहान शहरांतील युवकांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या प्रतिभेला संधी देणे आणि क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्यासाठी प्रेरणा देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. समाजात वाढत्या व्यसनाधीनतेपासून युवकांना दूर ठेवण्यासाठी फिटनेस आणि क्रीडा क्षेत्र प्रभावी माध्यम ठरू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.स्पर्धेतील सर्वोच्च मानाचा 'Champion of Champion' किताब पुलगाव येथील अमर ठाकरे यांनी पटकावून आपली ताकद व कौशल्य सिद्ध केले. तर उत्कृष्ट पोझिंग व सादरीकरणाच्या जोरावर प्रज्वल उरकांदे यांनी 'Best Poser' पुरस्कार मिळवत उपस्थितांची दाद मिळवली. स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिक, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.वजन गटानुसार झालेल्या स्पर्धेत विविध गटांतील स्पर्धकांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. स्पर्धकांच्या मेहनतीचे आणि क्रीडाप्रेमाचे कौतुक करत आमदार बकाने यांनी भविष्यात अशा स्पर्धांचे प्रमाण वाढवून युवकांना अधिक संधी उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त केला.स्पर्धेला प्रमुख अतिथी म्हणून वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. पंकजजी भोयर, आमदार मा. राजेशजी बकाने, खासदार मा. रामदासजी तडस, खासदार मा. सुरेशजी वाघमारे, श्री. सुनिलजी गफाट, पोलीस उपविभागीय अधिकारी वंदना कारखेले,अपर तहसीलदार स्नेहा क्षीरसागर युवमोर्चा जिल्हाध्यक्ष श्री. पृथ्वी शिंदे तसेच श्री. राहुलजी चोप्रा व पुलगाव नगर परिषदेचे सर्व भाजप नगरसेवक आणि भारतीय जनता पार्टी पुलगावचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून प्रसिद्ध मराठी अभिनेत्री वर्षा उसगावकर आणि अभिनेते देवदत्त नागे यांनी उपस्थिती दर्शवून युवकांमध्ये उत्साह निर्माण केला. उपस्थित मान्यवरांनी युवकांनी क्रीडा व फिटनेस क्षेत्राकडे मोठ्या प्रमाणात वळण्याचे आवाहन केले.स्पर्धेचे परीक्षण अनुभवी परीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. परीक्षक मंडळात श्री. अविनाश लोखंडे, श्री. प्रीतम पाटील, श्री. वैभव फुके, डॉ. योगेश देवतळे व श्री. विशाल मरदवार यांचा समावेश होता. परीक्षकांनी अत्यंत बारकाईने स्पर्धकांचे मूल्यमापन करत स्पर्धेची गुणवत्ता उंचावली.ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा, पुलगाव शहरच्या कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. संतोष तिवारी, भरत नागपाल, सुमित सिधानी, तेजस ढोणे, रवि शर्मा, शुभम गुप्ता, प्रफुल रावेकर, सुरज सुरसकार, गोविंद वर्मा, रत्नेश दुबे, अमोल देशमुख, यश भेंडारकर, सुमित धनाडे, तनय चंदन आदी कार्यकर्त्यांनी आयोजनात मोलाचे योगदान दिले.या स्पर्धेमुळे पुलगाव शहरासह संपूर्ण परिसरात फिटनेस आणि क्रीडा संस्कृतीला मोठी चालना मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. युवकांचा उत्स्फूर्त सहभाग, नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती आणि उत्कृष्ट नियोजनामुळे कार्यक्रमाला भव्य यश मिळाले. भविष्यात देवळी–पुलगाव मतदारसंघात क्रीडा, आरोग्य आणि युवक सक्षमीकरणासाठी अशाच उपक्रमांची मालिका राबविण्याचा संकल्प आमदार राजेश बकाने यांनी व्यक्त केला.



आर्वीच्या शिरपेचात मानाचा तुरा

आमदार सुमित वानखेडे यांची वेल्स विद्यापीठ (यु. के.) येथील विशेष अभ्यासासाठी निवड

महाराष्ट्र विधानमंडळाच्या निवडक सदस्यांसाठी युनायटेड किंगडम (U.K.) येथे आयोजित उच्चस्तरीय अभ्यास दौऱ्यासाठी आर्वीचे कार्यतत्पर आमदार सुमित वानखेडे यांची विशेष निवड करण्यात आली आहे. वेल्स विद्यापीठामार्फत आयोजित या महत्त्वपूर्ण दौऱ्यात सुमित वानखेडे यांना स्थान मिळणे, हा त्यांच्या अभ्यासू वृत्तीचा आणि आजवरच्या उल्लेखनीय कार्यशैलीचा मोठा सन्मान मानला जात आहे. या दौऱ्यासाठी प्रतिनिधींचे रविवारी, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी लंडन येथे आगमन होणार असून, ही निवड संपूर्ण आर्वी विधानसभा क्षेत्रासाठी भूषणावह आणि अभिमानास्पद बाब आहे. या दौऱ्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, युनायटेड किंगडममधील प्रतिष्ठित वेल्स विद्यापीठाच्या लॅम्पिटर कॅम्पस येथे एका विशेष विद्यापीठ अभ्यासक्रमाचे



आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, १६ फेब्रुवारी ते शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत "सुशासन व सार्वजनिक धोरण" (Good Governance & Public Policy) या विषयावर आमदार वानखेडे विशेष प्रशिक्षण घेणार आहेत. लंडन हे शहर व्यवस्थापन, आधुनिक पायाभूत सुविधा आणि पारदर्शक प्रशासकीय कार्यपद्धतीसाठी जगात अग्रेसर असून, या प्रगत कार्यप्रणालीचा प्रत्यक्ष अभ्यास करून त्यातील उत्तम संकल्पना आर्वी मतदारसंघात कशा राबवता येतील, यावर त्यांचा विशेष भर असणार आहे.आमदार सुमित वानखेडे यांनी आपल्या स्वकर्तृत्वाने आणि विकासकामांच्या जोरावर अल्पावधीतच स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली असून त्यांच्या या निवडीमुळे मतदारसंघात आनंदाचे वातावरण आहे. केवळ १५ निवडक आमदारांच्या या पथकात सुमितजींचा समावेश होणे, ही त्यांच्या कल्पक नेतृत्वाची पोचपावतीच मानली जात आहे. लंडन आणि वेल्स विद्यापीठातील या अभ्यासाचा आणि प्रशिक्षणाचा फायदा आगामी काळात आर्वी विधानसभा क्षेत्राचा कायापालट करण्यासाठी आणि जनतेला अपेक्षित विकासकामे पूर्ण करण्यासाठी नक्कीच होईल, असा विश्वास स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.

नेहरू विद्यालय सालोड येथे 1960 ते 2025 च्या माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहमिलन सोहळा उत्साहात संपन्न

योगेश काबंळे वर्धा(प्रतिनिधी)

नेहरू विद्यालय सालोड येथे सन १९६० ते २०२५ या कालावधीतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. पिढ्यान् पिढ्या घडवलेल्या या शैक्षणिक वास्तूत तब्बल सहा दशकांतील माजी विद्यार्थी, निवृत्त शिक्षक व सध्याचे शिक्षक एकत्र आल्याने कार्यक्रमाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.स्नेहमिलन सोहळ्याची सुरुवात माजी विद्यार्थ्यांच्या शाळेतील बँड पथका सोबत भव्य मिरवणुकीने करण्यात आली. गावातून मिरवणूक काढत माजी विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्रांगणात जल्लोषात स्वागत करण्यात आले. यानंतर आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आर. बी. शेंडे माजी शिक्षक होते. उद्घाटक म्हणून भीमराव मुटे निवृत्त शिक्षक तर प्रमुख अतिथी म्हणून रामराव वादीले संस्था सचिव, भगवंत झाडे, अण्णा



कोठेवार, सोनाली ठाकरे मुख्याध्यापिका, आशिष कुचेवार उपसरपंच, अण्णाजी गुंडलवार, विद्या कासटवार, प्रताप चरडे आदी मान्यवर उपस्थित होते.या वेळी माजी शिक्षकांनी शाळेतील आपल्या कार्यकाळातील आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतील अनुभव, शिस्त, संस्कार आणि शिक्षणाचे महत्त्व त्यांनी प्रभावीपणे मांडले. माजी विद्यार्थ्यांनीही आपल्या शालेय जीवनातील अनुभव सांगताना अनेक क्षणी वातावरण भावुक झाले. गुरु शिष्य नात्याचे महत्त्व, शिक्षकांचे ऋण आणि शाळेने दिलेले संस्कार यावर उपस्थितांनी मनापासून भावना व्यक्त केल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका रोशनी ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनुप झाडे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले तर आभार संजीव वाघ यांनी मानले. या प्रसंगी ज्येष्ठ माजी विद्यार्थी व माजी शिक्षकांचा शाल-श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.स्नेहमिलन सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे सुगम संगीताचा कार्यक्रम. संदीप रघाटाटे, संतोष पोटे, पंकज पोटे, यश गराट यांनी सादर केलेल्या सुमधुर गीतांनी कार्यक्रमाला सांस्कृतिक रंगत आणली. जुन्या-नव्या गीतांच्या सुरांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.या स्नेहमिलन सोहळ्यास माजी विद्यार्थी, निवृत्त शिक्षक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नेहरू विद्यालय सालोड हे केवळ शिक्षण देणारे नाही तर संस्कारांची शाळा असल्याचे या स्नेहमिलनातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

आष्टी तालुक्यातील लिलाव झालेल्या घाटातून रात्रपाळीत वाळूचोरी

- तालुक्यातील अंतोरा,चिंचोली, गोदावरी, टेकोडा,इस्माइलपुर, दलपतपूर घाटात रोजाना वाळू चोरी.
- वाळू घाटाचे लिलाव होऊन महिना ओलांडला मात्र घाट अद्यापही चालू नाही.
- महसूल प्रशासन वाळू चोरी बाबत सुस्त.

आष्टी (शहीद):– राज्य शासनाने वाळू चोरी रोखणे करीता अनेक उपाययोजना केल्या परंतु आष्टी तालुक्यातील वाळू चोरी रोखणेबाबत शासनाचा महसूल विभाग सबसे ठरला आहे. सविस्तर बातमी याप्रमाणे आहे की वर्धा जिल्ह्यातील तीन उपविभागातील आर्वी, वर्धा हिंगणघाट या उपविभागातील वर्धा नदीपत्रातील विभागणीय वाळू घाट लिलाव झाले. त्यापैकी आर्वी उपविभागातील वर्धा नदी पात्रातून एकूण दहा घाट लिलाव झाले असून त्यापैकी सात घाट आष्टी तालुक्यात येतात. वाळू घाट घेतलेल्या एजन्सी कडून आष्टी तालुक्यातील वाळू घाटात कोणतेही काम चालू न झाल्याने वाळू चोर याचा फायदा घेत तालुक्यातील अंतोरा, चिंचोली,गोदावरी, टेकोडा, इस्माईलपुर, दलपतपूर, या वाळू





घाटातून रोज रात्र पाळीत अनेक ब्रास वाळू चोरी करीत आहे. मात्र या प्रकरणात आष्टी तालुका महसूल विभाग मात्र सुस्त भूमिका बजावत असल्याने महसूल विभागाच्या आशीर्वादाने वाळू चोरी चालू असल्याबाबत तालुक्यात चर्चा सुरू आहे. वाळू घाटाचा लिलाव होऊन महिना ओलांडला मात्र अजूनही तालुक्यातील वाळूघाट चालू झाले नाही हे सुद्धा महसूल विभागाचे अपयश आहे ही जाणीवपूर्वक महसूल विभाग घाट चालू न व्हावे करिता प्रयत्न करीत आहे अशी चर्चा तालुक्यात रंगत आहे. महसूल विभागाने आपला सुस्तपणा सोडून वाळू चोरी बाबत कठोर कारवाई करीत तालुक्यातील वाळूघाट चालू व्हावे करिता शासन स्तरावर कारवाई करण्यात यावी ही मागणी होत आहे.

नालंदा विद्यापीठ पुणे मार्फत महाराष्ट्र राज्य गौरव पुरस्कार 2026 डॉक्टर विनोद विनायकराव देशमुख यांचा सन्मान

विरुळ आकाजी

नालंदा विद्यापीठ पुणे यांच्यावतीने पत्रकार भवन पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार 2020 प्रख्यात नाडी रोग तज्ञ व आयुर्वेदा प्रॅक्टिशनर डॉक्टर विनोद विनायकराव देशमुख यांना मानाचा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले आयुर्वेदिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य रुग्णसेवेतील निष्ठा तसेच समाज उपयोगी आरोग्यसेवा याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार सन्मान देण्यात आला या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवराची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर नितीन बडगे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र चित्रपट प्रदेश अध्यक्ष राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभाग तसेच हॉलीवुड कॉलेज हॉलिडे कंपनीचे संचालक यांनी कार्यक्रमाची नेतृत्व केले प्रमुख





पाहुणे म्हणून ह्युमन राइट्स कौन्सिल ऑफ इंडिया व राष्ट्रीय समिती करेक्शन अँड कंट्रोल चे प्रमुख डॉक्टर राजेंद्र सिंग वालिया उपस्थित होते यावेळी प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉक्टर गीता जोशी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सलग्न मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉक्टर प्राध्यापक संदीपिका डॉक्टर अर्चना देसाई तसेच मराठी चित्रपटातील चिमुकली अभिनेत्री यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन टॅलेंट कट्टा व नालंदा विद्यापीठ पुणे चे संस्थापक डॉक्टर दीपक दादाराव जाधव यांनी केले राज्याच्या विविध भागातून विशेष विदर्भतून मोठ्या संख्येने मान्यवर व पुरस्काराचे उपस्थित राहिले सोहळ्याविषयी उत्साहाचे वातावरण लाभले सामाजिक क्षेत्रातील सांस्कृतिक व आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तीच्या या गौरव करण्यात आला डॉक्टर विनोद देशमुख यांच्या सन्मानामुळे आयुर्वेद क्षेत्रातील कार्यकर्त्यांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली असून समाजपयोगी आरोग्य सेवेच्या कार्याला अधिक प्रेरणा मिळणा असल्याचे मान्यवरांनी आपल्या मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाला समूह उत्साह पूर्ण वातावरणात झाला. त्याच्या कार्याचा गौरव डॉ. सुतार साहेब राष्ट्रीय अध्यक्ष आयुष भारत डॉ असो महाराष्ट्र राज्य व डॉ किशोर बमनोटे सर आयुष भारत डॉ असो महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष व डॉ विपुल पाटील वर्धा जिल्हाध्यक्ष डॉ विनायक मेथे आयुष भारत डॉ असो महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष आयुष भारत डॉ असो महाराष्ट्र राज्य विदर्भ यांनी शुभेच्छा दिल्या.

आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी सिंगल फेज द्यावा

शिवसेना शिंदे गटासह शेतकऱ्यांनी केली सिंगल फेजची मागणी

साहुर (शरद वरकड)

आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर जंगली भाग असुन या भागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात जंगली जनावरांचा त्रास असल्याने शिवसेना शिंदे गटासह शेतकऱ्यांनी आष्टी येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी च्या कार्यालयात उपकार्यकारी अभियंता यांना निवेदन देण्यात आले या निवेदनात असे म्हटले आहेत की शेतकऱ्यांना शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी दिवसा थ्री फेज विद्युत पुरवठा देत आहेत त्यामुळे शेतकरी समाधानी आहे परंतु रात्रीच्या वेळी शेतकऱ्यांना शेतात जागल करावी लागते त्यामुळे रात्री शेतात सिंगल फेज विद्युत पुरवठा असणे फार आवश्यक आहे तसेच लहान मोठे उद्योग सुरू करण्यासाठी सिंगल फेजची आवश्यकता आहे जर शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी सिंगल फेज विद्युत पुरवठा सुरू केला तर शेतकऱ्यांना याचा फार मोठा फायदा होणार आहे त्यामुळे रात्रीच्या वेळी सिंगल फेज विद्युत पुरवठा सुरू करण्याची मागणी यावेळी करण्यात आली तसेच या भागात जंगली जनावरांचा मोठा हौदौस असून शेतातील पिके घरी आणण्यासाठी जागल केल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही त्यामुळे 90% शेतकरी हे रात्रीची शेतात जागल करतात त्यामुळे जंगली जनावरांचा मोठा धोका असतो अशावेळी अंधारात जंगली जनावरे हमला करू शकतात त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना सिंगल फेज ची अत्यंत आवश्यकता आहे म्हणून रात्रीच्या वेळीच सिंगल फेज शेतकऱ्यांना द्यावा जर निवेदनाची दखल घेतली नाही तर आंदोलन करून उपोषणाला बसणार असल्याचे मत शिवसेना शिंदे गटासह शेतकऱ्यांनी व्यक्त केले यावेळी शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते यामध्ये शिवसेना शिंदे गटाचे वर्धा लोकसभा संघटक रवी भाऊ बालपांडे जिल्हा प्रमुख प्रशांतभाऊ शाहागडकर उपजिल्हा प्रमुख दशरथजी जाधव तालुका प्रमुख चंद्रशेखर नेहारे उप तालुकाप्रमुख शरद वरकड शाखाप्रमुख विजय गावंडे उपशाखाप्रमुख प्रवीण मोहिते सचिव प्रफुल मुंदाने कोषाध्यक्ष प्रवीण धांदे सहसचिव शाम शिर्के , दिलीप मसराम,छगन ढोरे, प्रवीण दुधकवरे ,पांडुरंगजी हिवरे, नथ्थुजी चौधरी इत्यादी उपस्थित होते



साहेब सांगा ना हो तळेगाव ते आष्टी किती किलोमीटर असायला पाहिजे

11की. मि. 12की. मी. 13.की. मी. की. 14.की. मी. ते संबंधित विभागांनी सांगावे

तळेगाव प्रतिनिधी (राजेंद्र खंडारे)

तळेगाव श्यामजीपंत हे गाव चारही तालुक्याच्या मध्ये भागामध्ये व डोंगराच्या पायथ्याशी वसलेले एक गाव आहे आणि हे हायवे नंबर सहावर आहे व नागपूर मुंबई मार्गे सुद्धा गेलेला आहे लोक संख्या पाहिली तर साधारण आहे पण चौफुली असल्यामुळे येथे आवक जावक वाहनांची व जनतेची जास्त प्रमाणात असते पण त्यात तुम्हाला तळेगाव वरून आष्टीला जायचे असेल तर थोडे सावधान कारण असे की





सार्वजनिक जे बोर्ड आहे किलोमीटरचे तर त्यावर लिहिले आहे एका बोर्डवर13किलोमीटर तर दुसऱ्या बोर्डावर 14 किलोमीटर तर या रस्त्याच्या बाजूने असलेल्या किलोमीटरचा जो गोटा असते तोच गायब आहे त्यावर 11 किलोमीटर आहे आहे ना फजिती तर नेमके तळेगाव आष्टी किती किलोमीटर आहे हे समजेना तळेगावतील नागरिकांना विचारणा केली असता ते सांगतात आष्टी 12 किलोमीटर पण आष्टी किती किलोमीटर आहे हे स्पष्ट करावे अशी मागणी वाहन चालकामध्ये व नागरिकांमध्ये होत आहे जेणेकरून त्यांना समजेल की आष्टी किती किलोमीटर आहे नेमके हीनेमके किती किलोमीटर असायल पाहिजे तर साहेब तुम्ही सांगा ना हे संबंधित विभागाने सांगावे आणि चुकलेले किलोमीटर बोर्ड दुरुस्त करावे आणि आष्टी

समुद्रपूर तालुक्यातील ताडगाव येथील सौ. मीना प्रकाशसिंग छोयले यांचे सह असंख्य कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये पक्ष प्रवेश आमदार समीर कुणावार यांची प्रमुख उपस्थिती

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे

समुद्रपूर:- दिनांक :- ०८ फेब्रुवारी विधानसभा क्षेत्राचे कार्यसम्राट आमदार समीर कुणावार यांचे कार्यशैलीने प्रभावित होऊन स्थानिक समुद्रपूर तालुक्यातील ताडगाव येथील सौ. मीना प्रकाशसिंग छोयले यांचे सह यांचेसह असंख्य कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात पक्षप्रवेश घेतला. सदर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आमदार समीर कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, विधानसभा प्रमुख संजय डेहणे, माजी जिल्हा परिषद सदस्य मंदाताई चौधरी, माजी पंचायत समिती उपसभापती योगेश फूसे, ज्येष्ठ नेते रवीभाऊ ठोंबरे, भाजपा नेते मनोज बारसकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आ. समीर कुणावार यांनी मीनाताई छोयले यांचे सह असंख्य कार्यकर्त्यांना भाजपाचा शेला देऊन सन्मान करीत त्यांचे जगातील सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भाजपामध्ये प्रवेश केल्याने स्वागत केले. पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करीत आ. कुणावार यांनी पक्षाचे ध्येयधोरणांचा समाजात प्रचार करण्याचे आवाहन केले.यावेळी मीनाताई छोयले यांचे सह सावित्रा चव्हाण, दुर्गा चौधरी, अस्मिता ढोणे, योगिता ननावरे, कलावती श्रीरामे, विमल दडमल, सुनंदा दडमल , रुंदा दडमल , कुसुम चौके, मारुती मसराम, ऋषी नन्नावरे, गुलाब रंधई, प्रदीप दडमल इत्यादी कार्यकर्त्यांना भारतीय जनता पार्टीत रितसर प्रवेश देण्यात आला.



मैक्स हॉस्पिटल, नागपूरने निरोगी जीवनशैली आणि कर्करोग जनजागृतीसाठी सायक्लोथॉनचे आयोजन केले

नागपूर, (दिलीप येवले):

वर्ल्ड कॅन्सर डे निमित्त जनजागृतीचा ठोस संदेश देत मैक्स हॉस्पिटल, नागपूरने कर्करोगाबाबत जागरूकता वाढवण्यासाठी आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी सायक्लोथॉनचे यशस्वी आयोजन केले. या उपक्रमात शेकडो नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला. विविध वयोगट आणि क्षेत्रांतील लोक एकत्र येत निरोगी आणि कर्करोग-जागरूक समाजासाठी सामूहिक संकल्प व्यक्त केला. कर्करोगाचा धोका कमी करण्यासाठी लवकर निदान, प्रतिबंधात्मक काळजी आणि सक्रिय जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने या सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले. सहभागी नागरिकांनी ठरवलेल्या मार्गावर जोशात सायकल चालवत एकजूट आणि कर्करोगमुक्त भविष्यासाठीची बांधिलकी दर्शवली.

यावेळी बोलताना प्रख्यात इंटरनॅशनल सायकलिस्ट आणि एन्ड्युरन्स ऍथलेट डॉ. अमित समर्थ म्हणाले, “कर्करोग हा आता आशाहीन आजार राहिलेला नाही. वैद्यकीय विज्ञानातील प्रगती, लवकर निदान आणि निरोगी सवयींचा अवलंब यामुळे अनेक प्रकारचे कर्करोग टाळता येऊ शकतात. अशा सायक्लोथॉनसारख्या उपक्रमांमुळे जनजागृती वाढवण्यास आणि लोकांना त्यांच्या आरोग्याची जबाबदारी घेण्यासाठी प्रेरित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली जाते.”

मैक्स हॉस्पिटल, नागपूरचे कर्करोग तज्ज्ञ कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून सहभागींसोबत संवाद साधत कर्करोग प्रतिबंध, तपासणी आणि उपचारांविषयी मौल्यवान मार्गदर्शन दिले. तज्ज्ञ पॅनेलमध्ये डॉ. अमोल डोंगरे, डायरेक्टर –मेडिकल ऑन्कोलॉजी; डॉ. शिझान परवेज, असोसिएट डायरेक्टर – रेडिएशन ऑन्कोलॉजी व रेडिओसर्जरी; डॉ.कवडू जवादे, कन्सल्टंट – सर्जिकल ऑन्कोलॉजी तसेच मैक्स हॉस्पिटल, नागपूरचे इतर कन्सल्टंट डॉक्टरांचा समावेश होता.

डॉ.अमोल डोंगरे,डायरेक्टर – मेडिकल ऑन्कोलॉजी,मैक्स हॉस्पिटल, नागपूर म्हणाले, “सुमारे एक-तृतीयांश कर्करोग वेळेवर तपासणी, लवकर निदान आणि नियमित व्यायाम, संतुलित आहार तसेच तंबाखूचे सेवन टाळणे यांसारख्या साध्या जीवनशैलीतील बदलांमुळे टाळता येऊ शकतात. अशा सायक्लोथॉनसारख्या उपक्रमांमुळे वैद्यकीय ज्ञान आणि समाजातील जागरूकता यामधील दरी कमी होते आणि लोकांना दीर्घकालीन आरोग्यासाठी सक्रिय पावले उचलण्यास प्रोत्साहन मिळते.”

या कार्यक्रमात विद्यार्थी, कामकाज करणारे व्यावसायिक, सायकलप्रेमी, तसेच मैक्स हॉस्पिटल, नागपूरचे डॉक्टर आणि कर्मचारी यांच्यासह ५०० हून अधिक लोकांनी सहभाग नोंदवला, ज्यामुळे हा खऱ्या अर्थाने समुदाय-केंद्रित उपक्रम ठरला.

सायक्लोथॉनचा समारोप उत्साही वातावरणात झाला. यामध्ये आरजे संवाद, झुंबा सत्र आणि विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स यांसारख्या आकर्षक उपक्रमांचा समावेश होता. लकी ड्रॉमुळे कार्यक्रमात अधिक उत्सुकता निर्माण झाली, ज्यामध्ये सहभागींसाठी नवीन सायकल जिंकण्याची संधी उपलब्ध होती. या उपक्रमाद्वारे मैक्स हॉस्पिटल, नागपूरने समुदाय आरोग्य, कर्करोग जनजागृती आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेप्रती आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली आणि योग्य वेळी कृती व निरोगी सवयी जीवन वाचवू शकतात हा संदेश दिला.

रमाईचा त्याग आणि संघर्षानेच बाबासाहेबांचे कार्य सिद्धीस गेले

सेलू येथील कार्यक्रमात मान्यवरांचे प्रतिपादन

सेलू: (प्रशांत झाडे)

मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नवचैतन्य बुद्ध विहार, सेलू येथे अभिवादन कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.सर्वप्रथम उपस्थित सर्वांनी मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार व पुष्प अर्पण करून अभिवादन केले.यावेळी वक्त्यांनी रमाईंच्या जीवनातील त्याग, समर्पण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यातील त्यांच्या अतुलनीय वाटचालीवर प्रकाश टाकला.रमाईंचे कार्य आणि त्यागकार्यक्रमात बोलताना डॉ. सरोज भगत यांनी नमूद केले की, मातोश्री रमाबाई आंबेडकरांचे बाबासाहेबांवर निस्सीम प्रेम होते. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतही त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याला सहकार्य करून वाटेल ते सर्वस्व अर्पण केले, पोटचे लेकरं मरण पावली पण समाजाच्या हिताचे कार्य सोडले नाही."जर रमाई नसत्या, तर बाबासाहेब एवढ्या मोठ्या प्रमाणावर कार्य करू शकले नसते आणि आज आपण जो सुवर्णकाळ पाहत आहोत, तो दिवस आपल्याला पाहायला मिळाला नसता," असे उद्गार त्यांनी काढले.वैशाली पाटील, समीक्षा तेलंग, निहारिका पाटील आणि विशाखा नगराळे, यांनीही आपल्या मनोगतातून रमाईंच्या धैर्याला आणि त्यागाला वंदन केले. संसाराचा गाडा ओढताना त्यांनी सोसलेले कष्ट हे समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.या सोहळ्याला प्रमुख उपस्थिती म्हणून खालील मान्यवर उपस्थित होते: सोपान टेम्भूरणे,ताराचंद पोपटकर,सुधाकर बेसेकर,नवीन पाटील,बबन जामनकर,धम्म पाल जारुंडे,माधुरी धनविज,रत्नमाला म्हैसकर,सीमा तेलंग, लता जारुंडे, शोभा पोपटकर, रेखा साखरकर यांनी कार्यक्रमाला सहकार्य केले.कार्यक्रमाचे अतिशय नेटके संचालन व आभार प्रदर्शन विशाल नगराळे यांनी केले. बुद्ध विहारातील या कार्यक्रमाला परिसरातील बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



औद्योगिक-संस्थात्मक भागीदारीतून विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास

-'विदर्भ ॲडव्हान्टेज 2026' निमित्त विद्यापीठाचे सहा सामंजस्य करार

नागपूर : (दिलीप येवले) औद्योगिक आणि संस्थात्मक भागीदारीतून विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास तसेच रोजगाराच्या अनुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने 'विदर्भ ॲडव्हान्टेज २०२६' निमित्त सहा सामंजस्य करार (MoU) केले आहे. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) यांच्या वतीने आयोजित 'ॲडव्हान्टेज विदर्भ-२०२६ खासदार औद्योगिक महोत्सवाच्या' निमित्ताने कुलगुरू कक्षात शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी एमओयू करण्यात आले. विशेष म्हणजे, यापैकी ३ सामंजस्य करारांचा थेट लाभ पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांना होणार आहे.या सामंजस्य करार (MoU) हस्तांतरण प्रसंगी मा. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. विजय खंडाल, आयक्यूएसी संचालक डॉ. नंदकिशोर करडे, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, आयआयएल संचालक डॉ. प्रकाश इटनकर, डॉ. निशिकांत राऊत, डॉ. आर. एम. जुगाडे, डॉ. समित माहोरे आणि डॉ. विजय तांगडे यांची उपस्थिती होती. या सहकार्यामध्ये 3A केमी प्रा. लि., नागपूर (प्रतिनिधी : श्री. आलोक सिंग, व्यवस्थापकीय संचालक), नॅव्हिटस केमिकल्स प्रा. लि., नागपूर (प्रतिनिधी: डॉ. श्याम तितरमारे, संचालक), पीक्स ॲनालिटिकल ट्रेनिंग सेंटर, नागपूर (प्रतिनिधी : श्री. अमोल बी. गावंडे, संस्थापक व प्रशिक्षक), मनी बी इन्स्टिट्यूट प्रा. लि. (प्रतिनिधी: श्रीमती शिवानी दानी वखरे, संस्थापक संचालक), अनंत एव्हिएशन, नागपूर (प्रतिनिधी: कॅप्टन विशाल बांगरे, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी) तसेच असोसिएशन ऑफ इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट यांचा समावेश आहे.या सामंजस्य करारांचा उद्देश विद्यार्थी प्रशिक्षण, इंटर्नशिप, कौशल्य विकास, संयुक्त संशोधन, सल्लागार सेवा तसेच शैक्षणिक व औद्योगिक संसाधनांचा प्रभावी वापर करणे हा आहे. विद्यापीठाच्या नियमांनुसार या उद्योग व संस्थांमधील तज्ज्ञ प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस या स्वरूपात विद्यापीठास सहकार्य करू शकतील, ज्यामुळे उद्योगाभिमुख शैक्षणिक अध्यापन अधिक सुदृढ होईल.या वेळी मा. कुलगुरूंनी सर्व सहभागी उद्योग व संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून सामंजस्य करारांची प्रभावी, परिणामाभिमुख व परस्पर हितसंबंधांवर आधारित अंमलबजावणी करण्याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. या सहकार्यामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना उद्योग संपर्क, रोजगार क्षमतेत वाढ, संशोधनाच्या संधी आणि कौशल्य विकास यामध्ये लक्षणीय लाभ होईल, तसेच विद्यापीठ व उद्योग क्षेत्रातील दीर्घकालीन व अर्थपूर्ण भागीदारी अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

सोनटक्के परिवारांकडे गजानन महाराजांचा प्रकट दिन साजरा

खापरखेडा प्रतिनिधी:- गण गण गणात बोते च्या मंत्राने दुमदुमले वाड नंबर 3, मास्टर वसाहत, भानेगाव येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा देवेंद्र सोनटक्के यांच्या निवासस्थानी गजानन महाराजांचा प्रकट दिन मोठ्या आनंदाने, उत्साहाने साजरा करण्यात आला. आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई, भजन, पूजन, महाआरती, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले होते. यात हजारो भाविक भक्तांनी गजानन महाराजांचा फोटोला नतमस्तक होऊन "श्री" चा आशीर्वाद घेऊन महाप्रसाद ग्रहण केला. याप्रसंगी श्रीमती मंदाकिनी सोनटक्के, देवेंद्र सोनटक्के, शीतल सोनटक्के, ज्ञानेश्वरी सोनटक्के, विवेक सोनटक्के, मयूर सोनटक्के, नैतिक सोनटक्के, वरिष्ठ पत्रकार दिलीप येवले, सुधाकर कडू, प्रवीण ढोके, अजय येवले, सुरेश वानखडे, निंबाळकर, ठाकरे, केतन हिवज आदी गजानन महाराजांचे भक्त उपस्थित होते.



नविन बिना बौद्ध विहारात त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची 128 वी जयंती उत्साहात साजरी

खापरखेडा (दिलीप येवले): स्थानिक भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्र महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ, नवीन बिना यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन बिना बौद्ध विहार येथे त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी धम्मपीठावर उपस्थित कार्यक्रमाचे मार्गदर्शक भंते प्रियदर्शी (उ.प्र.), सत्कार मूर्ती, उद्घाटक व प्रमुख अतिथी शैल्य कांत पाण्डेय, महाप्रबंधक खनन, ड्ब्लु. सी. एल. उप क्षेत्रीय प्रबंधक भानेगांव क्षेत्र, प्रमुख उपस्थिती लक्ष्मण लांजेवार, कुसुम गौरकर, प्रभा लोखंडे, सत्यभामा वसनिक, आणि भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना व कार्यक्रम अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांच्याहस्ते तथागत गौतम बुद्ध, संविधान निर्माता विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या छायाचित्राला व पूर्ण पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून, सामुहिक बुद्ध वंदना घेवून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. त्यागमूर्ती माता रमाई जयंतीचे औचित्य साधत ड्ब्लु. सी. एल. भानेगावच्या सी.एस.आर निधीतून लावण्यात आलेल्या ग्रीन जिमचे लोकार्पण शैल्य कांत पाण्डेय यांच्याहस्ते करण्यात आले. त्यांनी स्वस्थ शरीरामुळे आचार व विचार निरोगी राहतात अशाच निरोगी विचारांमुळे त्यागमूर्ती माता रमाई डॉ. बाबासाहेबांच्या जीवनात भक्कम सेतु बनून राहिल्या त्याच त्याग व बलिदानाची आवश्यकता आज समाजाला आहे असे मत मांडले. भंते प्रियदर्शी यांनी बुद्धांच्या समानतेच्या तत्वाचा अंगीकार करून भारतीय संविधानाने महिलांना अधिकार दिले. त्यामागे बाबासाहेबांची प्रेरणा रमाई होती त्यांच्या पदचिन्हावर मार्गक्रमण करण्याचा सल्ला त्यांनी दिला. बहुजन मुक्ती मोर्चाचे सदस्य प्रमोद कुमार (उ.प्र.) व वर्षा लांजेवार यांनीहि आपल्या मानोगतातून रमाईच्या सात्विक जीवनाचा परिचय करून दिला. अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनात त्यागमूर्ती माता रमाईची भूमिका स्पष्ट करतांना बाबांच्या कलमेची शाई रमाई होती। त्यांच्याप्रमाणे अंहंकार सोडून सर्वांना गोडी-गुलाबीने राहण्याचे आव्हान केले. यावेळी रंगबिरंगी वेशभूषेत बाल-बलीकांनी सादर केलेल्या नृत्य व लेझिम आणि ज्ञानेश्वर ढोके, मीना नरेश ढोके यांनी सादर केलेल्या गीतांनी व शार्वी बागडेच्या रमाईच्या वेशभूषेने कार्यक्रमाची रंगत वाढवली. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे उपाध्यक्ष अनिल लांजेवार, कोषाध्यक्ष रविंद्र ढोके, नरेश डोंगरे, सचिव मुकेश बागडे, मिलिंद गौरकर, आनंद वासनिक, पृथ्वीराज गोलाईत, संचित गौरकर, सल्लागार समितीचे तुळशिराम बागडे, मनोहर गजभिये, कृष्णाजी वासनिक, ओमप्रकाश गौरकर, भैयाजी सोनटक्के, किशोर चव्हाण, , अशोक कांबळे, अभियंता उत्तम खोब्रागडे, आम्रपाली आणि संघमित्र महिला मंडळाच्या कांता बागडे, रेखा लांजेवार, बेबी वासनिक, राधा गौरकर, निर्मला चिमनकर, मीना मेश्राम, नंदा सोमकुंवर, सत्यफुला कांबळे, मालवी नारनवरे, सुनंदा लांजेवार, सारिका तागडे, कल्पना वासनिक, प्रीती गोलाईत, प्रिया डोंगरे, ,रोहिणी धनवटे, आशा गौरकर, मनीषा ढोके आणि बहुसंख्येने परिसरातील मुले आणि नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वंदना गणवीर, सूत्रसंचालन विशाखा ढोके आणि आभार पायल लांजेवार यांनी मानले. * शैल्य कांत पाण्डेय यांच्याहस्ते ड्ब्लु. सी. एल. सी.एस.आर निधीतून लावण्यात आलेल्या ग्रीन जिमचे लोकार्पण करण्यात आले.* मार्गदर्शक भंते प्रियदर्शी (उ.प्र.) – बाबासाहेबांची छाया व प्रेरणा रमाई होती*अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे – रमाईप्रमाणे अंहंकार सोडून सर्वांना गोडी-गुलाबीने राहावे. नृत्य व गीतांच्या सदरीकरणाने कार्यक्रमाची रंगत वाढवली.

उभरते सितारेमध्ये 'आशेचे दीप'

नागपूर (दिलीप येवले) :-मुलांच्या जन्मापासून ते ३ वर्षांपर्यंत त्यांच्या विकासाचा सुमारे १८ टक्के भाग पूर्ण होतो. हळूहळू त्यांच्यात विचार करण्याची व समजून घेण्याची क्षमता विकसित होते. म्हणूनच त्यांना कला आणि साहित्याच्या दिशेने प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार (World Health Organization) शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम असलेली व्यक्ती म्हणजेच निरोगी माणूस. मुलांच्या वयानुसार त्यांच्याही वेगवेगळ्या समस्या असतात. त्यामुळे त्यांनाही प्राणायाम व योगाचे शिक्षण दिले पाहिजे. यामुळे मुलांमधील चिंता (एंग्जायटी) कमी होते. हे विचार डॉ. कोमल वासनिक यांनी मुलांमध्ये व त्यांच्या पालकांमध्ये मांडले तसेच त्यांना वैद्यकीय माहितीही दिली. या प्रसंगी पद्मा इंटरनॅशनल स्कूलच्या संचालिका व मुख्याध्यापिका नीरजा प्रशांत शंभरकर विशेष उपस्थित होत्या.विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाचा नवोदित प्रतिभांना समर्पित उपक्रम 'उभरते सितारे'चे आयोजन हिंदी मोर भवनातील उत्कर्ष हॉलमध्ये करण्यात आले. कार्यक्रमाचा विषय 'आशेचे दीप' असून तो शैक्षणिक, ज्ञानवर्धक आणि संगीतमय सादरीकरणे प्रशंसनीय ठरली. यामध्ये आदिप्ता नंदेश्वर हिने कविता सादर केली. आदित मिंज यांनी आपल्या गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. पद्मा इंटरनॅशनल स्कूलच्या माहिरा खोबरागडे, सानवी लोहे, विहा आडे, प्रिशा कांबळे, अदिप्ता नंदेश्वर, प्रियंका महतो आदी मुलांनी अतिशय सुंदर नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.मुलांच्या सादरीकरणांचे कौतुक त्यांच्या पालकांसह प्रियंका बिसेन खोबरागडे, आशा भगत, गीता सुरेश मिंज, रेखा पुरुषोत्तम वासनिक, रत्नमाला निकोडे, देवयानी आडे, विजय भगत, वैशाली मदारे, संतोष धुर्वे आदींनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपक भावे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच उपस्थित सर्व प्रेक्षक, कलाकार आणि मुलांचे आभार संयोजक युवराज चौधरी यांनी आपल्या शब्दांत व्यक्त केले.





केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांचे निवेदन

तालुका प्रतिनिधी (अमोल झाडे) समुद्रपूर:- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जाम परिसरात मेट्रो रेल्वे येण्याबाबत पुढील बैठकीत हा प्रस्ताव ठेवणार असल्याचे अतुल वांदिले यांना आश्वासन. बुटीबोरी ते जाम - हिंगणघाट दरम्यान मेट्रो रेल्वे मार्गाचा विस्तार करण्याकरिता केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी निवेदन दिले.या निवेदनावर सकारात्मक विचार करून येत्या बैठकीत जाम पर्यंत ही मेट्रो नेण्याबाबत प्रस्ताव ठेवण्यात येणार असल्याचे ना. नितीन गडकरी यांनी सांगितले.



हिंगणघाट हे एक महत्त्वाचे औद्योगिक केंद्र असून येथे राज्यस्तरीय मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यरत आहे. या भागातून मोठ्या संख्येने शेतकरी, उद्योजक, बेरोजगार युवक, तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी दररोज नागपूरकडे प्रवास करतात. मेट्रो रेल्वे सेवेचा विस्तार झाल्यास विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नागपूर येथे ये-जा करणे सुलभ होईल तसेच सर्वसामान्य नागरिकांचा वेळ व खर्च दोन्हींची बचत होईल. सध्या राष्ट्रीय महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी असून त्यामुळे अपघातांचे प्रमाण व प्रदूषणात सातत्याने वाढ होत आहे. मेट्रो रेल्वे सेवा सुरू झाल्यास वाहतुकीवरील ताण कमी होऊन पर्यावरण संरक्षणासही मोठे योगदान मिळेल. यासोबतच स्थानिक उद्योगधंद्यांना चालना मिळेल व परिसराचा सर्वांगीण विकास साधता येईल. मेट्रो रेल्वे सेवा जाम पर्यंत पोहोचल्यास वर्धा, चंद्रपूर व यवतमाळ या तीन जिल्ह्यातील नागरिकांनाही त्याचा थेट लाभ होईल.सदर प्रस्तावावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जाम परिसरात मेट्रो रेल्वे येण्याबाबत पुढील बैठकीत हा प्रस्ताव ठेवला जाईल असे आश्वसन दिले. यावेळी श्री हेमंत गडकरी उपस्थित होते.

संतांची संगत माणसाला सन्मार्गकिडे नेते.!

गौळ येथे रविंद्र महाराज विलायतकर यांचे प्रबोधन

गौळ (वार्ताहर) संसाराच्या व्यापामध्ये अडकलेल्यामानवाला योग्य दिशा देण्याचे सामर्थ्य केवळ संत संगतीत आहे. चांगल्याची संगत जीवनाला सुसंस्कृत वळण देते आणि जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्तहोण्याचा मार्ग दाखवते. त्यामुळे संतांच्या सान्निध्यात राहणे ही काळाची गरज आहे,असे प्रतिपादन संत सेवक रविंद्र महाराज विलायतकर विणेकरी दिव्य तेजतपोनिधी संत लोटांगण महाराज वारी परंपरा यांनी केले.गौळ येथील श्री संत भदाजी महाराज व महादेवबाबा सच्चिदानंद खटेश्वर महाराज तपोभूमी मठ श्रीक्षेत्र गौळ येथे श्रीसंत गजानन महाराज प्रगटदिन व मुर्ती प्राणप्रतिष्ठा व प्रगटदिन महोत्सव रविवार ८ फेब्रुवारी रोजी काल्याच्या किर्तनात महाराज बोलत होते. वारकरी महीलामंडळाकडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कीर्तन सेवेतून मार्गदर्शन करताना महाराज म्हणाले की, संसारामध्ये आपल्याला अनेक सोयरे-धायरे मिळतात, परंतु प्रत्यक्ष मृत्यूनंतर परमेश्वराच्या दारी आपली शिफारस करणारे केवळ संतच.असतात. संतांची संगत वाईट प्रवृत्तींनादूर ठेवते आणि सात्विक आचरणाची प्रेरणा देते. मानवाने आपल्या वाणीतून आणि कर्मातून नेहमी चांगल्याची संगत धरली पाहिजे, तरच मानवी जीवनाचेकल्याण होईल असे विलायतकर महाराज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. शनिवारी ७ फेब्रुवारी रोजी राञी संत गजानन महाराज यांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली.यावेळेस महीला मंडळाच्या दिंड्या, अश्व विद्युत रोषणाई करण्यात आली. ८ फेब्रुवारी काल्याचे किर्तनानंतर विजय महाराज, व गावातील काही व्यक्तीचा सत्कार करण्यात आला. यानंतर गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.यानंतर एकनिष्ठ गजानन भक्त समाजसेवी आशिष कसनारे वर्धा यांच्या तर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या बाबत रविंद्र महाराज विलायतकर व महीलामंडळाकडून आशिष कसनारे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.रात्री ७ ते १० सुरसंगम संगित अभंगवाणी वर्धा यांचा कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता सर्व वारकरी भजनी मंडळ, गौळ नवयुवक तरुण-तरुणी ने सहकार्य केले.

